रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३३७
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २५ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'सामान्य वीज ग्राहकांच्या हितासाठी ग्रीड सपोर्ट' / २

पनवेलमध्ये ग्रीन सोल्यूशन प्रयोगाची यशस्वी सुरुवात / ६

एफआयएच प्रो लीगमध्ये भारताचा पाकवर विजय / ८

## लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापणे होणार अनिवार्य

**मुंबई :** राज्यातील बालविवाहाची प्रथा पूर्णपणे बंद करण्यासाठी आणि अल्पवयीन मुलींचे लग्न लावून



देणाऱ्या प्रवृत्तींना रोखण्यासाठी महाराष्ट्र शासन एक अत्यंत कठोर निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. यापुढे लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेवर वधू आणि वर या दोघांच्याही नावापुढे त्यांची अधिकृत जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव सरकारकडून अंतिम टप्प्यात आहे. राजस्थान सरकारने यापूर्वीच असा नियम लागू केला असून तिथे मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर आता महाराष्ट्रही याच धर्तीवर कडक नियमावली लागू करणार आहे. बालविवाहामुळे केवळ कायद्याचा भंग होतो असे नाही, तर यामुळे अल्पवयीन मुलींचे शिक्षण अर्धवट सुटते तसेच कमी वयात मातृत्व लादले गेल्याने त्यांच्या आरोग्यावर आणि मानसिक स्थितीवर अत्यंत घातक परिणाम होतात, असे महिला व बालविकास विभागाने नमूद केले आहे.

### नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव द्या!

# भाजपचे लक्षवेधी आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने बुधवारी (दि. २४) विमानतळ परिसरात लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी 'दिबां'च्या प्रतिमेला अभिवादन करून नामकरणाच्या मागणीचा पुनरूच्चार करण्यात आला.

यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे ही संपूर्ण रायगड आणि नवी मुंबई परिसरातील जनतेची भावना आहे. नामकरणाचा निर्णय केंद्रीय पातळीवर लवकरात लवकर व्हावा.



या आंदोलनात आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत, पनवेल पं.स.च्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूरचे सभापती कृष्णा पारंगे यांच्यासह (पान २ वर..)

# मोरबे धरणातील पाण्याच्या न्याय्य वाटपासह रायगड जलसंपदा नियामक प्राधिकरण स्थापन करा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मागणी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील झपाट्याने वाढणारे नागरीकरण, औद्योगिकीकरण, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना प्रकल्प तसेच सिडकोच्या विस्तारामुळे पिण्याच्या पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असून भविष्यात ती अधिक गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मोरबे धरणातील पाण्याचे न्याय्य व नियोजनबद्ध वाटप करण्याची तसेच रायगड जलसंपदा नियामक प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभागाचे मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महापालिकेलगतच्या विचुंबे, पळस्पे, कोळखे, उसर्ली, देवद, पाली देवद, आकुर्ली, आदई आदी ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये तसेच सिडको व नैना क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प उभे राहत असून लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, मात्र या भागांना नवीन जलजोडण्या मिळण्यात अडचणी येत असल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण होत आहे. मोरबे धरण नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील एक महत्त्वाचा जलस्रोत असून त्यातील बहुतांश पाणी नवी मुंबई महापालिकेकडून वापरले जात असल्याचे चित्र आहे. (पान २ वर..)



पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंजार लोकनेते स्व.दि.बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त बुधवारी संग्राम निवासस्थानी विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपमहापौर प्रमिला पाटील, पं.स. सभापती रंजना वास्कर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पं.स. सदस्य राजेंद्र पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, आदेश ठाकूर यांच्यासह उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी 'दिबां'च्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करत पवित्र स्मृतीस आदरांजली वाहिली.

## विद्यार्थ्यांची अपार आयडी नोंदणी पूर्ण करण्याची मागणी

**मुंबई :** राज्यातील विद्यार्थ्यांची अपार आयडी निर्मिती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून मोठ्या संख्येने विद्यार्थी या आयडीपासून वंचित असल्याचा मुद्दा उपस्थित केला.




राज्यातील सुमारे २३ लाख ४९ हजार ७३१ विद्यार्थी अपार आयडीपासून वंचित असल्याचे तसेच मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, लातूर व अहिल्यानगर जिल्ह्यांत नोंदणीचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. शाळा स्तरावरील पाठपुरावा, तांत्रिक अडचणी व जनजागृतीचा अभाव यामुळे प्रक्रिया धीम्या गतीने सुरू असल्याचा मुद्दाही मांडण्यात आला. (पान २ वर..)

## वलप ग्रामपंचायतीतील २६६० बनावट जन्म नोंदीप्रकरणी तीन आरोपी अटकेत

■ ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती

**मुंबई :** पनवेल तालुक्यातील वलप ग्रामपंचायतीमध्ये बनावट जन्म नोंदणी प्रमाणपत्रे तयार केल्याची गंभीर बाब उघडकीस आली होती. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या गंभीर विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले.

वलप ग्रामपंचायतीच्या युजर आयडी व पासवर्डचा गैरवापर करून सुमारे दोन हजार ६६० बनावट जन्म नोंदणी प्रमाणपत्रे तयार करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्या अनुषंगाने किती आरोपींना अटक करण्यात आले, त्यांच्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले व या प्रकरणात बनावट जन्म नोंदणी प्रमाणपत्रे तयार करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह भविष्यात अशा घटना रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे? नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत? असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.

या प्रश्नावर ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, (पान २ वर..)

## निवडक

### कल्याणमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार; नराधमाला बेड्या

**कल्याण :** येथील पूर्व भागात सात वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत ५५ वर्षीय संशयित आरोपी झुमय शेख याला काही तासांतच ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांचे विशेष पथक या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहे.

### विलास घुले खून प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन

**बीड :** जिल्ह्याच्या केज तालुक्यातील टाकळी फाटा येथील हॉटेल चालक विलास घुले यांच्या हत्या प्रकरणात फरार असलेल्या सर्व नऊ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, या हत्या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी आता विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे.

# रायगड जिल्ह्यात पावसाचे शतक; बळीराजा सुखावला!

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मंगळवारपासून चांगला पाऊस पडत आहे. जिल्ह्यात बुधवारी (दि.२४) सकाळी संपलेल्या २४ तासांत सरासरी १२१.६ मिमी पावसाची नोंद झाली. उरण तालुक्यात सर्वाधिक २४४ मिमी पाऊस पडला.

आतापर्यंत जून महिन्याच्या सरासरीच्या ३३.२ टक्के पाऊस पडला आहे. दोन दिवस पडत असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून पुढील दोन दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

जिल्ह्यात सोमवार संध्याकाळपासूनच चांगला पाऊस पडत आहे. अधूनमधून जोरदार सरी येत आहेत. या समाधानकारक पावसामुळे बळीराजा सुखावला असून खोळंबलेल्या शेतीच्या कामांना सुरुवात झाली आहे. धरणक्षेत्रातदेखील चांगला पाऊस पडत आहे.

पावसामुळे जिल्ह्यात काही ठिकाणी वृक्ष उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडीत होणे अशा घटना घडल्या. मुंबई-पुणे



महामार्गावर दांडफाट्याजवळ लोधिवली येथे पुणेकडील बाजूस झाड पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या आयआरबीच्या पथकांनी पडलेले झाड हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला. मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटात चोळई येथे दरड कोसळली. त्यामुळे या ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू होती. रायगड किल्ल्यावर जाणाऱ्या पायरी मार्गावर दरड कोसळल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी दोन दिवस बंद करण्यात आला आहे. आगामी शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दरडी हटविण्याचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे.

जिल्ह्यात जून महिन्यात सरासरी ५४२.६ मिमी पाऊस पडतो. आतापर्यंत १७०.९ मिमी पाऊस पडला आहे. गेल्या वर्षी ६११.४ मिमी पाऊस पडला होता. जून महिन्याच्या सरासरीच्या ३२.६ टक्के पाऊस झाला आहे. मागील वर्षी जून २४ जूनपर्यंत सरासरीच्या ११६.५ टक्के पाऊस पडला होता.

**पावसाची तालुनिहाय आकडेवारी (मिमीमध्ये)**

अलिबाग १६५.९, पनवेल ९९.९, कर्जत ४२.३, खालापूर ९२.८, उरण २४४.०, सुधागड १४४.८, पेण १९०.९, महाड १०६.९, माणगाव १००.९, रोहा १२८.३, पोलादपूर ११२.५, मुरूड १२३.३, श्रीवर्धन ७५.७, म्हसळा १०९.३, तळा १६९.७, सरासरी १२१.६ मिमी.

## कशेडी घाटात भूस्खलन; महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू



**पोलादपूर :** मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटात चोळई गावानजीक भूस्खलन झाले. त्यामुळे घाटातील हॉटेल अन्नपूर्णा ते चोळईदरम्यान दोन किमी अंतरावर एकेरी वाहतूक सुरू आहे. पावसामुळे डोंगर भागातून लाल मातीचे ढिगारे रस्त्यावर येण्यास सुरुवात झाली असून संबंधित यंत्रणा याकडे लक्ष देऊन आहेत.

## दरड कोसळल्याने किल्ले रायगडचा पायरी मार्ग बंद

**महाड :** अतिवृष्टीमुळे किल्ले रायगडावरील पायरी मार्गावर महादरवाजा परिसरात दरड कोसळल्याने पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा मार्ग २४ व २५ जून रोजी बंद ठेवण्यात येणार आहे. तसे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी दिले आहेत.



## पनवेलमध्ये येत्या रविवारी 'पुरवैय्या' सांगीतिक संध्याकाळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेलच्या वतीने आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख सहयोगाने 'पुरवैय्या' या विशेष सांगीतिक संध्याकाळी कार्यक्रमाचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. हा भव्य रविवारी (दि. २८) रात्री ८ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.




या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कलाकारांचा सहभाग असून मुख्य निवेदक व सहआयोजक म्हणून पुष्कर श्रोत्री, गायक म्हणून अजित परब, अर्चना गोरे आणि मुक्ता जोशी, तर निवेदिका व सह-आयोजिका म्हणून योगिनी पोफळे सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे लेखन प्रवीण जोशी यांनी केले आहे.

विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी प्रवेश पूर्णतः विनामूल्य असून विनामूल्य प्रवेशिका २६ जूनपासून नाट्यगृहात उपलब्ध राहतील. बांगला संगीतकारांच्या मधुर हिंदी गाण्यांचा अनोखा सुरांचा उत्सव पनवेलकर रसिकांसाठी एक आगळावेगळा अनुभव ठरणार आहे.

या दुर्मिळ संगीत संध्याकाळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९) किंवा चिन्मय समेळ (८७६७१४९२०३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अलिबाग देहेन येथे बंधाऱ्याला भगदाड

### गावाचा संपर्क तुटला



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे देहेन गावाजवळील बंधाऱ्याला मोठे भगदाड पडले आहे. पाण्याच्या वाढत्या प्रवाहामुळे बंधाऱ्याचा काही भाग वाहून गेल्याने देहेन गावाचा परिसरातील इतर गावांशी असलेला संपर्क तात्पुरता खंडित झाला आहे.

गेले दोन दिवस अलिबाग तालुक्यात जोरदार पाऊस सुरू आहे. या पावसाने देहेन गावचा बंधारा वाहून गेला. हा बंधारा ग्रामस्थांच्या दैनंदिन वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असल्याने त्याच्या नुकसानीचा थेट परिणाम नागरिकांवर झाला आहे. गावातील विद्यार्थ्यांना शाळा आणि महाविद्यालयात जाण्यास अडचणी निर्माण झाल्या असून कामानिमित्त बाहेर जाणाऱ्या नागरिकांनाही पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे. काही किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत असल्याने वेळ आणि आर्थिक खर्च वाढला आहे.

याबाबत प्रशासनाकडे तातडीने दखल घेण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. बंधाऱ्याची त्वरित दुरूस्ती करून वाहतूक पूर्ववत करावी तसेच पावसाळ्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## राज्यात नवी ८८ महसूल कार्यालये

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने प्रस्तावित ८८ नवीन महसूल कार्यालयांच्या निर्मितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहचली आहे. राज्य शासनाने या कार्यालयांबाबत हरकती व सूचनांसाठी १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

यामध्ये १० अपर जिल्हाधिकारी कार्यालये, सात उपविभागीय कार्यालये, दोन तहसीलदार कार्यालये आणि ६९ अपर तहसीलदार कार्यालयांचा समावेश आहे. हरकतींचा एकत्रित अहवाल १२ जुलैपर्यंत शासनाकडे सादर केला जाणार आहे. नागरिकांना विविध दाखल्यांसाठी किंवा सरकारी कामांसाठी लांबचा प्रवास करावा लागू नये, म्हणून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

## मुंबई लोकलमध्ये तरुणाची हत्या; आरोपी अटकेत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांची लाईफ लाईन असलेल्या लोकलमध्ये भर गर्दीच्या वेळी एका तरुणाची किरकोळ वादातून चाकूने हत्या केल्याची घटना मंगळवारी (दि.२३) रात्री घडली होती. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी रोशन सुवर्णा याला अटक केली आहे.



मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मंगळवारी पश्चिम रेल्वेवर लोकल डब्यांमध्ये प्रवाशांची गर्दी होती. जोराचा पाऊस सुरू असल्याने लोकलचा दरवाजा बंद करण्यावरून चर्चगेट-नालासोपारा फास्ट लोकलच्या फर्स्टक्लास डब्यातून प्रवास करणाऱ्या मयंक लोहार (वय २२) या तरुणाचे दुसऱ्या प्रवाशासोबत भांडण झाले. पाहता पाहता या वादात आरोपीने मयंकच्या पोटात सपासप चाकूने वार केले. हातात सुरा घेऊन रक्ताळलेल्या मयंकाला तो पुन्हा पुन्हा धमकावत होता. अखेर बोरीवली स्थानकावर लोकल पोहचताच आरोपी निघून गेला.

दरम्यान, काही प्रवाशांनी या घटनेची खबर रेल्वेस्थानकावर दिल्यानंतर रेल्वे पोलिसांनी तत्काळ उपचारासाठी मयंकचा जवळील रुग्णालयात दाखल केले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

आरोपीच्या शोधासाठी सात विशेष पथके तयार करण्यात आली होती. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे लोहमार्ग पोलिसांनी फरार आरोपीचा माग काढला व त्याला अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

# सामान्य वीज ग्राहकांच्या हितासाठी ग्रीड सपोर्ट -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



सौर ऊर्जेचे उत्पादन वाढत्या वीज वापर अतिरिक्त अतिरिक्त. या तारे निर्माण होणारा खर्च सामान्य ग्राहकांना पडू नये यासाठी ग्रीड सपोर्ट आकारण्यात आला आहे. हे शुल्क ०.१३ टक्के ग्राहकांना लागू होते. हा ग्राहकांच्या अतिरिक्त नफ्यामध्ये काही विशिष्ट कपात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

विद्यमान औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांसाठी वीज विक्री करण्यासाठी विद्यमान विद्यमान विधानपरिषद सदस्य सतेज उर्फ बंटी पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला. सदस्य भाई जगताप , एकनाथ खडसे , डॉ. नीलम गोऱ्हे उपप्रश्न विचारत यांनी विचारात मांडले. तुम्हाला ते बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, ग्रीड सपोर्ट १ फेब्रुवारी २०१६ पासून लागू करण्यात आला आणि तो पूर्वलक्षी प्रभावाने (रेट्रोस्पेक्टिव्ह) लागू नाही. महाराष्ट्रामकनियामकने (एमआरसी) यांनी केलेल्या काही गणनांमध्ये ४० हजार कोटींची मोठी संख्या दुहेरी विचारात सरकारच्या निदर्शनास आणून दिव्य विद्युत् कॉंनेक्शनने एकत्र करणे सुरू केले आहे.

राज्य सर्व फीडर्स स्मार्ट मीटर बसविण्याचे काम पूर्ण आणि वीज वापरात आता कोणत्याही प्रकारचा अंदाजाधारित संवाद साधला नाही. महाराष्ट्रातील औद्योगिक वीज दर अनेक राज्यांचे कमी आहेत. २०२५-२६मध्ये महाराष्ट्रातील दर प्रतियुनिट ८.१९ रुपये असून ते तामिळनाडू, तेलंगणा आणि मध्य प्रदेशापेक्षा कमी आहे. बहुवर्षीय दरनिश्चिती (मल्टी इयर टॅरिफ) अंतर्गत २०२९-३०पर्यंत दर निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये महाराष्ट्रातील वीज दर आकारमान्यता सर्वात मोठी संख्यात्मक राहतील, असे त्यांनी सांगितले.

जर महाराष्ट्रातील वीज दर खरोखरच जास्त, तर उद्योग इतर राज्य वळले असते. मात्र व्यापारी मोठ्या उद्योग व्यवसाय करत आहेत. सध्या निर्माण सौर ऊर्जेपैकी सुमारे ३५ टक्के वीज दिवसा लाभला जातो , तर ६ टक्के वीज वीज बँकिंगच्या माध्यमातून मागितली जाते. आयात निर्यात अतिरिक्त भार. हा प्रश्न सोडवण्यासाठी उपाय शोधून काढण्यासाठी हा प्रभावी पर्याय असून मोठ्या प्रमाणात पॉवरब्लॉक स्टोरेज उभारण्याचे काम करत आहे.

२०२२मध्ये एकूण वीजप्रतिनिधी नूतनीकरण सक्षम ऊर्ज वाटा १५ टक्के होता. विविध लोकसभा निवडणुका २०२९-३० पर्यंत हा वाटा ५२ लोकसभांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट. सेना ३८ हजार मेगावॅटचे नूतनीकरण सक्षम ऊर्जा विकसित होत आहेत, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

ग्रीड सपोर्ट आणि टाइम ऑफ डेड (ग्रीड सपोर्ट आणि टाइम ऑफ डेओडी) धोरणात्मक सौरऊर्जा उत्पादकांना पुन्हा चर्चा करण्यास राज्य सरकार तयार करण्याचे मुख्यमंत्री सांगतात, मुख्य वीज ग्राहकांना कमी भार पडावा, हेच शासन उद्दिष्ट स्पष्ट केले.

मुख्यमंत्री यांनी सांगितले. पीएम सूर्य घर आणि कृषी पंपासाठी इनपॅनल वेर्सची व्यवस्था करण्यात आली असून, निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात आली आहे. महाराष्ट्राने सुमारे टक्के सौर ऊर्जा पंप बस उठवून केंद्र आणि इतर राज्यांना ' महाराष्ट्र ' चा अवलंब विरोध बुलंद केले. कृषी पंपांसाठी विमा संरक्षण आणि पाच संस्थांची देखभाल ही निश्चित वर्षभरासाठी करण्यात आली आहे.

# अल्पवयीन वाहनचालकांमुळे अपघात ; उरणमध्ये महिलेचा मृत्यू

**उरण : बातमीदार**

उरण शहरासह ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांकडून दुचाकी वाहने चालविण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या अल्पवयीन वाहनचालकतेचा फटका नागाव येथील एका कुटुंबाला बसला आहे.

१६ जून रोजी नागाव-म्हातवली मुख्य मार्गावरील स्टार कॉम्प्लेक्स परिसरात एका अल्पवयीन मुलाने नॉन गियर स्कुटर चालवत प्रथम केगाव येथील प्रशांत दर्णे यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर शाळेत लहान मुलाला घेऊन जाणाऱ्या नागाव काठेआळी येथील हर्षदा हेरंब म्हात्रे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात हर्षदा म्हात्रे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला होता.

अपघातानंतर त्यांना तातडीने खारघर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावत गेली आणि अखेर त्यांचे दिनांक २२ जून २०२६ रोजी निधन झाले.

त्यांच्या निधनामुळे नागाव परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित मुलाच्या पालकांवर व गाडी मालकावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १९९ ए व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या घटनेनंतर उरण परिसरात अल्पवयीन वाहनचालकांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सकाळच्या शाळांच्या वेळेत, क्लासेस परिसरात, बाजारपेठांमध्ये तसेच पीरवाडी समुद्रकिनाऱ्यासह विविध भागांत अल्पवयीन मुले-मुली दुचाकी वाहने चालविताना दिसत आहेत. विशेष म्हणजे अनेक जण हेल्मेटशिवाय, ट्रिपल सीट आणि भरधाव वेगाने वाहने चालवताना दिसत आहे. याबाबत उरण पोलीस व वाहतूक विभागाने शाळा, महाविद्यालये, क्लासेस परिसर आणि प्रमुख चौकांमध्ये विशेष मोहीम राबवून अल्पवयीन वाहनचालकांवर व पालक आणि गाडी मालकावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# खालापूर तालुकास्तरीय कृषी मेळावा उत्साहात

**चौक : प्रतिनिधी**



जग ऑनलाईन असले तरी जगाला चालवण्याचे काम शेतकरी करतो, शेतकरी शेतावर ऑनलाईन असला तरच जग चालते असे प्रतिपादन रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी केले रायगड जिल्हा परिषद अलिबाग, कृषी विभाग पंचायत समिती खालापूर व तालुका कृषी अधिकारी कार्यालय खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कृषी मेळावा छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे संपन्न झाला, त्यावेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर बोलत होते.

रायगड जिल्हा परिषद कृषी सभापती वैकुंठ पाटील आणि खालापूर पं.स. सभापती कृष्णा पारंगे उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील शेतकरी औद्योगिक विकासा मुळे कमी होत असल्याची खंत कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी व्यक्त करून शेतकरी समृद्धध होण्यासाठी अशा प्रकारचे मेळावे घेतले जात असून सी एस आय फंडातून शेतकरी यांना मदत करण्याचे जाहीर केले, तर रायगड जिल्हा राज्यात सातव्या क्रमांकाचा असल्याचेही त्यांनी सांगितले.कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी तयार केलेल्या कृषी योजनांच्या पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कृषी विषयक प्रात्यक्षिक व प्रदर्शन मांडण्यात आले होते.खालापूर तालुक्यातील प्रगतशील शेतकरी सन्मान योजनांचे लाभ घेणाऱ्या २३ शेतकरी बांधवांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.यावेळी जिल्हा परिषद सेस फंड योजना, पंचायत समिती सेस अंतर्गत लाभार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

# गव्हाण विद्यालयात लोकनेते दि.बा. पाटील यांना अभिवादन

**गव्हाण :रामप्रहर वृत्त**



स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे झुंजार लढवय्ये नेते माजी खासदार लोकनेते स्वर्गीय दि.बा.पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

बुधवार दिनांक २४ जून रोजी हा कार्यक्रम इयत्ता दहावी अ च्या वर्गातर्फे आयोजित करण्यात आला. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रंथपाल महेश म्हात्रे सर यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढविण्यात आले. यावेळी वर्गशिक्षक परदेशी यांनी आपल्या वर्गाला मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे विद्यालयाचे गुरुकुल विभाग प्रमुख संदीप भोईर, शितलकुमार म्हात्रे, इयत्ता आठवी अ च्या वर्गशिक्षिका विद्या पाटील, रयत सेवक दयानंद खारकर, अरुण कोळी यांनी देखील दि बां.च्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी इयत्ता दहावीचे काही विद्यार्थी प्रातिनिधीक स्वरूपात उपस्थित होते.

दीन दलितांचे कैवारी, गोरगरीब शेतकऱ्यांचे तारणहार ठरलेल्या दि.बां. विषयी विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यापैकी शितल सुतार, सानवी कडू, जिग्नेश कोंडके, वेदांती कोळी, प्रगती संजय केदारे, कैवल्य कोळी, कार्तिकी कोळी, प्रिया कोळी या इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपलं मनोगत व्यक्त करून दि.बां च्या स्मृतीस उजाळा दिला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षला पाटील यांनी केले.

# 'उबाठा'चे माजी जिल्हाप्रमुख विजयराज खुळे यांचा शिवसेनेत प्रवेश



**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग देणारी महत्त्वपूर्ण घटना घडली असून, रायगड जिल्ह्यात ऑपरेशन टायगर जोरात सुरू आहे .माणगाव तालुक्यातील उबाठा गटाचे दक्षिण रायगडचे माजी जिल्हाप्रमुख विजयराज खुळे यांनी आपल्या शेकडो समर्थक व कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.यावेळी शिवसेनेत प्रवेश झालेल्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर आणि भरतशेठ गोगावले यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीवर विश्वास व्यक्त करत शिवसेनेच्या विचारधारेशी बांधिलकी जाहीर केली.

रायगड जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होत असून विविध पक्ष व गटांतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेकडे वाढता ओढा दिसून येत आहे. या पक्षप्रवेशामुळे माणगाव तालुका तसेच दक्षिण रायगडमधील शिवसेनेची ताकद आणखी वाढणार असल्याची भावना व्यक्त केली.

# मराठी चित्रपटसृष्टी महामंडळाचे मोठे पाऊल!

## आरोग्य विमा, वेतनवाढ आणि ज्येष्ठ कलाकारांसाठी मानधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या कार्यकारिणी बैठकीत मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासाला चालना देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कलाकार, तंत्रज्ञ, कामगार आणि ज्येष्ठ कलावंतांच्या कल्याणासाठी विविध योजनांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

राज्यात चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विविध भागांत चित्रनगरी उभारण्याबाबत राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी स्वतंत्र कंटेनर थिएटर उभारणीचा प्रस्ताव शासनासमोर मांडण्यात येणार आहे. कलाकार आणि तंत्रज्ञांच्या आरोग्य सुरक्षेसाठी पुढील तीन महिन्यांत सुमारे ६० हजार जणांना आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याचा निर्धार महामंडळाने व्यक्त केला आहे. यासोबतच सदस्यांचे संपूर्ण डिजिटलायझेशन करून त्यांना आधुनिक सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

महामंडळाच्या कार्याचा विस्तार करण्यासाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये १७ संचालक पालक म्हणून नियुक्त करण्यात येणार असून ते स्थानिक कलाकार आणि तंत्रज्ञांच्या समस्यांवर लक्ष ठेवतील. नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आणि अहिल्यानगर येथे नवीन संपर्क कार्यालये सुरू करण्याचाही निर्णय घेण्यात आला. ज्येष्ठ कलाकारांच्या सन्मानासाठी विशेष मानधन योजना राबविण्यात येणार आहे. तसेच सीएसआर निधीच्या माध्यमातून ज्येष्ठ कलावंतांसाठी आधुनिक सुविधांनी युक्त वृद्धाश्रम उभारण्याची संकल्पना महामंडळाने मांडली आहे. कलाकारांच्या निवासाची अडचण लक्षात घेऊन मुंबई आणि पुणे येथे विश्रामगृह उभारण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

मराठी चित्रपट क्षेत्राला एकत्र आणण्यासाठी आणि उद्योगासमोरील आव्हानांवर चर्चा करण्यासाठी फेब्रुवारी २०२७ मध्ये पहिले मराठी चित्रपट संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. या संमेलनासाठी पुणे आणि रत्नागिरी या शहरांचा विचार सुरू असल्याची माहिती देण्यात आली. चित्रपट क्षेत्रातील कामगार, लाईटमन, स्पॉट बॉय, सेटिंग बॉय, ज्युनिअर आर्टिस्ट आणि इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनात २० टक्क्यांची वाढ करण्याचा ऐतिहासिक ठरावही कार्यकारिणीने मंजूर केला. या निर्णयाची अंमलबजावणी डिसेंबर २०२५ पासून करण्यात यईल.

# तुपगावात महिलेचा विनयभंग

**खोपोली :** महिलेला घरात एकटी पाहून दादाराव गालफाडे (वय ५५) धर्मनाथ नगर, तुपगाव कॉर्नर, ता.खालापुर याने महिलेचा विनयभंग केल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली.पीडित महिला घरात एकटी असल्याचे पाहुन दादाराव यांनी तिला पाठीमागुन मिठी मारुन, तिचा गाउन फाडुन तिच्या मन्नास लज्जा उत्पन्न करून तिचा विनयभंग केला.याबाबत पीडित महिलेने खालापूर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे . अधिक तपास महिला सहाय्यक फौजदार चंदा गायकवाड ह्या करीत आहेत.

# पनवेल महापालिका क्षेत्रात येत्या रविवारी पोलिओ लसीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येत्या रविवारी (२२ जून) राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लसी देण्यात येणार आहे. महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे.

यामध्ये ० ते ५ वयोगटातील अपेक्षित ६४ हजार १७२ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेवून मोहीमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता २६ नागरी आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात ३९२ स्थायी, २३ ट्रान्झिट व ४५ फिरते मोबाईल असे एकूण ४६० पोलिओ लसीकरण पथके कार्यरत असणार आहेत.

या लसीकरण मोहिमेसाठी रेल्वे स्टेशन ,बस स्टॅन्ड अशा ठिकाणी ट्रान्झिट व मोबाईल पथके तयार करण्यात आली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि आरसीएच अधिकारी डॉ.गणेश नायर यांनी या लसीकरण मोहिमेचे सूक्ष्म नियोजन केले आहे. या मोहीम अंतर्गत वंचित बालकांना महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्यावतीने पुढील चार दिवस लसीकरण करण्यात येणार आहे.

पान १ वरुन

## भाजपचे लक्षवेधी आंदोलन

प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र, स्थानिक संघटनेचे प्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक-नगरसेविका, ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान उपस्थितांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी जोरदारपणे मांडली. शासनाने जनभावनेचा सन्मान करून विमानतळाच्या नामकरणाबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## मोरबे धरणातील पाण्याच्या न्याय्य वाटपासह रायगड जलसंपदा नियामक प्राधिकरण स्थापन करा

सिडको क्षेत्रातील खारघर, कामोठे, तळोजा, नवीन पनवेल आदी वसाहती तसेच आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना प्रकल्प व औद्योगिक विकासामुळे भविष्यातील पाणी मागणी लक्षणीयरीत्या वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांचे एकात्मिक जलनियोजन सुनिश्चित करण्यासाठी रायगड जिल्ह्यासाठी स्वतंत्र जलसंपदा नियामक प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली असून मोरबे धरणातील उपलब्ध पाण्याचे वैज्ञानिक मूल्यमापन, पनवेल महापालिका, सिडको, नैना क्षेत्र, ग्रामपंचायत व औद्योगिक क्षेत्रांसाठी स्वतंत्र जलकोटा निश्चित करणे, जलस्रोतांचा एकाधिकार टाळणे, दीर्घकालीन लोकसंख्या व विकास आराखड्यानुसार जलनियोजन, सिडको व लगतच्या ग्रामपंचायत क्षेत्रांसाठी राखीव जलकोटा निश्चित करणे, जलवाटपातील प्राधान्य व वाद निवारण व्यवस्था निश्चित करणे आदी अधिकार या प्राधिकरणास देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यासाठी स्वतंत्र जलसंपदा नियामक प्राधिकरण स्थापन करण्याबाबत तातडीने उच्चस्तरीय बैठक आयोजित करावी तसेच मोरबे धरणातील उपलब्ध पाण्यातून सिडको क्षेत्र, नैना क्षेत्र आणि पनवेल महापालिकेलगतच्या वाढत्या ग्रामपंचायत क्षेत्रांसाठी स्वतंत्र व कायदेशीर संरक्षित जलकोटा निश्चित करण्याबाबत आवश्यक धोरणात्मक निर्णय घ्यावेत, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली आहे. या निर्णयामुळे रायगड जिल्ह्याच्या दीर्घकालीन जलसुरक्षेला बळ मिळेल व भविष्यातील पाणीटंचाई टाळता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## विद्यार्थ्यांची अपार आयडी नोंदणी पूर्ण करण्याची मागणी

या प्रश्नावर शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे की, हे खरे आहे की अपार आयडी नोंदणी प्रक्रियेत काही विद्यार्थी अद्याप वंचित आहेत. तथापि, सन २०२५-२६च्या यु-डायस प्लस माहितीनुसार राज्यातील ८९.०८ टक्के विद्यार्थ्यांची अपार आयडी नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांसाठी नोंदणीसाठी ३० जून २०२६पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तसेच संबंधित जिल्ह्यांमध्येही ८५ टक्क्यांहून अधिक नोंदणी पूर्ण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी केंद्रप्रमुख, तालुका एमआयएस समन्वयक आणि जिल्हा संगणक प्रोग्रामर यांच्यामार्फत शाळांना तांत्रिक सहाय्य दिले जात आहे. आधार संबंधित त्रुटी दूर करण्यासाठी पोस्ट ऑफिसमार्फत प्रत्येक तालुक्यात आधार मशीन व ऑपरेटर उपलब्ध करून देण्यात आले आहेत तसेच राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर सतत समन्वय साधून नोंदणी प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांची डिजिटल शैक्षणिक ओळख व शिष्यवृत्ती तसेच शासकीय योजनांचा लाभ सुलभ करण्यासाठी अपार आयडी अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही या उत्तरात अधोरेखित करण्यात आले आहे.

## वलप ग्रामपंचायतीतील २६६० बनावट जन्म नोंदीप्रकरणी

### तीन आरोपी अटकेत

वलप (ता. पनवेल, जि. रायगड) ग्रामपंचायतीच्या नागरी नोंदणी प्रणाली (सीआरएस)वरील ॲड ओल्ड इव्हेंट या पर्यायाचा अवलंब करून डिजिटाइज्ड करण्यात आलेल्या जुन्या जन्म नोंदींची समीक्षा करतेवेळी २६६० जन्म नोंदी या बनावट असल्याचे माहे फेब्रुवारी २०२६मध्ये निदर्शनास आले. बनावट जन्म नोंदी रद्द करण्याबाबतची कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया सुरु करण्यात आली तसेच पोलीस ठाण्यात प्रथम खबर अहवाल (एफआयआर) रजि.क्र. ५१/२०२६ नोंदविला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता सन २०२३चे कलम ३३८, ३१८(४), ३३६ (३), ३४०सह आयटी ॲक्ट कलम ४३, ६६ सी, ६६ (ड) या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास व कार्यवाही पोलीस निरीक्षक गुन्हे, पनवेल तालुका पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्यामार्फत सुरू आहे तसेच de.crsorgi.gov.in ही ऑनलाईन संगणक प्रणाली वापरताना घ्यावयाची दक्षता व प्रणाली एसओपी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर) अनुसार योग्यरीत्या हाताळण्याबाबत सर्व निबंधक जन्म-मृत्यू यांना वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचे कार्यालयामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत, असेही ग्रामविकासमंत्री गोरे यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे.

## दुखवटा

### मीना ठाकूर



**उरण :** चिरनेर (मुळपाडा) येथील मीना वसंत ठाकूर (६४) यांचे अल्पशा आजाराने रविवारी (दि.२१) दुःखद निधन आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन पुत्र, एक कन्या, सुना, व नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.३०) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर उत्तरकार्य विधी गुरुवारी (दि.२) चिरनेर मुळपाडा येथील राहत्या घरी दुपारी १२ वाजता होणार असल्याची माहिती अमित ठाकूर यांनी दिली.

# पनवेल मनपाच्या ॲनिमल वेल्फेअर समितीची बैठक

## प्राणी–मनुष्य संघर्ष निवारणासाठी उपाययोजनांवर सखोल चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका स्तरावर गठित करण्यात आलेल्या ॲनिमल वेल्फेअर कमिटी (प्राणी कल्याण समिती)ची बैठक बुधवारी (दि. २४) आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात घेण्यात आली. प्राणी संगोपनकर्ता आणि इतर रहिवाशी यांच्यातील संघर्षाचा सामना करताना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी ॲनिमल वेलफेअर समितीची स्थापना करण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्राणी व मनुष्य यांच्या मधील संघर्ष तसेच फिडींग स्पॉटबद्दल उद्‌भवणाऱ्या तक्रारी या सर्वबाबींवर चर्चाकरिता ॲनिमल वेलफेअर समितीची पालिका स्तरावर बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, पशुधन विकास अधिकारी डॉ.मुकेश मर्चंटे, आयडीए एनजीओचे डॉ. अमेय तांडेल, निरीक्षक कल्पेश कदम, खांदेश्वर पोलीस स्थानकाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक तळोजा निलम पवार, पनवेल पोलीस स्थानकाच्या के.बी म्हात्रे उपस्थित होते.

या बैठकीत सर्वोच्च न्यायालय तसेच ॲनीमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया (एडब्लूबीआय)ने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची माहिती देण्यात आली. विशेषतः प्राणी जन्म नियंत्रण नियमन २०२३ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील भटक्या श्वानांचे पकडणे, निर्बिजीकरण, लसीकरण आणि आवश्यक उपचारांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकी मध्ये पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रम विषयक माहिती देण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सार्वजनिक ठिकाणी भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्यास प्रतिबंध करण्यात आला असून, अधिकृत फीडिंग स्पॉट निश्चित करण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्राथमिक तपासणीनंतर काही फीडिंग स्पॉट निश्चितही करण्यात आले आहेत. याशिवाय आक्रमक व रेबीज संशयित श्वानांसाठी स्वतंत्र निवारा केंद्र उभारण्याचा प्रस्ताव असून पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजे येथे हे केंद्र उभारण्याचे नियोजन आहे.

### हेल्पलाईन अन् ॲप

तक्रार निवारण यंत्रणा संबंधित तक्रारींच्या निवारणासाठी महापालिका स्वतंत्र यंत्रणा राबवित आहे. नागरिकांसाठी ABC हेल्पलाइन क्रमांक ९३२००५६५८९ उपलब्ध करून देण्यात आला आहे तसेच नागरिकांनी आपल्या तक्रारींची नोंद Panvel Connect App या ऑनलाइन प्रणालीवर करावी, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# तळोजा मध्यवर्ती जेलमध्ये चरससह शिपायाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा मध्यवर्ती कारागृहात खाकी वर्दीतीलच अंमली पदार्थांचा तस्कर असल्याचे उघड झाले आहे. कारागृहातील २४ वर्षीय शिपायाला प्रवेशद्वारावर करण्यात आलेल्या झडतीदरम्यान अंमली पदार्थांसह रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित शिपायाला अटक करण्यात आली आहे.




ही घटना तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या प्रवेशद्वारावर घडली. कारागृह प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिपाई आदित्य शेलार हा दिवसपाळीत कार्यरत होता. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने कारागृहातील एका हवालदाराने त्याची झडती घेतली.

यावेळी त्याच्या खाकी पँटच्या खिशातून अंमली पदार्थांचा साठा आढळून आला. झडतीदरम्यान शेलारकडून ४५.९२ ग्रॅम वजनाचा चरस तसेच २०.५५ ग्रॅम वजनाच्या काही अंमली गोळ्या जप्त करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांची किंमत सुमारे ४७ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कारागृह प्रशासनाने दिलेल्या तक्रारीनुसार, न्यायबंदी आणि कैद्यांना अंमली पदार्थांचा पुरवठा करण्याच्या उद्देशाने हा साठा कारागृहात आणला जात असल्याचा प्राथमिक निष्कर्ष तपासात समोर आला आहे. या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाण्यात संबंधित शिपायाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तळोजा कारागृहात यापूर्वीही अवैध मोबाईल फोन आणि इतर प्रतिबंधित वस्तू सापडल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कारागृहातील सुरक्षाव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत असतानाच आता खाकी वर्दीतील कर्मचाऱ्याच अंमली पदार्थांच्या तस्करीत सहभागी असल्याचे समोर आल्याने कारागृह प्रशासनासमोर नवे आव्हान निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास खारघर पोलीस करीत आहेत.

# हुंडा मागणाऱ्या इंजिनीयर तरुणासह नातेवाईकांवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

साखरपुड्याचा सोहळा पार पडताच अभियंता असलेल्या वराने लग्नापूर्वी ५० लाख रुपये रोख हुंड्याची मागणी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी पाच जणांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. डोंबिवलीतील पिडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले असून हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डोंबिवली येथे राहणाऱ्या एका तरुणीचा विवाह मुंबईतील दादर (पश्चिम) येथील ३० वर्षीय इंजिनीयर (अभियंता) तरुणासोबत ठरला होता. अनुरूप विवाह संस्थेच्या संकेत स्थळावरील ओळखीतून हा विवाह निश्चित करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. २० जून रोजी पनवेलजवळील शेडुंग फाटा परिसरातील शिल्प रिसॉर्ट येथे साखरपुडा आणि हळदी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी साखरपुड्याचा कार्यक्रम पार पडताच वराने वधूच्या मावशीकडे लग्नापूर्वी ५० लाख रुपये रोख देण्याची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. वधूपक्षाने वर आणि त्याच्या कुटुंबीयांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी मागणीवर ठाम राहत वधूपक्षाला शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या वधूपक्षाने कार्यक्रमस्थळ सोडून डोंबिवली गाठली. त्यानंतर डोंबिवली पोलीस ठाण्यात ऑनलाइन तक्रार दाखल करण्यात आली. प्राथमिक नोंदीनंतर हे प्रकरण पुढील तपासासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले. पीडित तरुणीच्या तक्रारीवरून अभियंता वरासह त्याच्या कुटुंबातील चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते खेळाडूंचा गौरव

## प्रशिक्षक भूपेंद्र गायकवाड यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या मैदानावर गेल्या वीस वर्षांपासून (२००६पासून) पनवेल परिसरातील मुला–मुलींना तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्शल आर्ट व आत्मरक्षणाचे प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांच्या भूपेंद्र मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोव्हायडर अकॅडमीच्या २० वर्षपूर्तीनिमित्त गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सातवी एशियन व आंतरराष्ट्रीय सवाते चॅम्पियनशिप काठमांडू (नेपाळ) येथे सहभागी होऊन



भारताचा तिरंगा उंचावणाऱ्या अकॅडमीतील खेळाडूंचा प्रमाणपत्र वितरण करून सत्कारही झाला.

स्पर्धेत आदित्य खंडिजोड, ध्रुव कोलतेकर, अविर बनसोडे, ध्रुव दिघाडे, यश मोरे, प्रमोद ठोंबरे व मंथन रोटे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत देशाचे नाव उज्वल केले तसेच आंतरराष्ट्रीय व एशियन पंच म्हणून गणेशा शिंगोटे, भूपेंद्र गायकवाड यांनीही जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमातील विशेष बाब म्हणजे सीकेटी महाविद्यालयातील एसवायबीकॉम विद्यार्थी आदित्य अमोल खंडिजोड याची ९ ते १२ सप्टेंबरदरम्यान फ्रान्स येथे होणाऱ्या सवात वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी निवड झाल्याबद्दल त्याचा विशेष सन्मान करण्यात आला तसेच जागतिक ऑलिंपिक दिनानिमित्तही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, एसएमडीएल प्राचार्य डॉ. प्रीती महाजन, फिजिकल डायरेक्टर डॉ.व्ही.बी. नाईक, शीतल साळुंखे, सुहास धायंजे, सुशांत पोळसर आदी उपस्थित होते.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला तसेच भूपेंद्र गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव झाला.

# ट्रेलरच्या धडकेने स्कुटीचालक महिलेचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव ट्रेलरची धडक एका स्कुटीला बसून सदर स्कुटीवरील महिला चालक ही गंभीररित्या जखमी होवून तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पनवेल शहराजवळील आई कृपा ढाब्याजवळ डेरवली व कोळखेमधील कट, पुणे–पनवेल जुन्या हायवे रोडवर घडली आहे.स्कुटी क्रं.एमएच–०२–जीआर–००६४ ही घेवून सुगंधा भगत (३५) या पनवेल बाजूकडे जात असताना त्यांना एका ट्रेलरवरील चालकाने भरधाव वेगाने गाडी चालवून त्यांच्या स्कुटीस पाठीमागून धडक मारुन त्या जमीनवर पडून ट्रेलरचे चाक त्यांच्या डोक्यावरुन जावून त्या गंभीररित्या जखमी होवून मयत झाल्या आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# 'रयत'च्या कामोठे विद्यालयात लोकनेते स्व. दि.बा.पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे येथे लोकनेते दि.बा. पाटील यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

महापुरुषांच्या महान कार्याची ओळख विद्यार्थ्यांना शालेय जीवनात होण्याच्या उद्देशाने जयंती व पुण्यतिथी साजऱ्या केला जातात. भूमिपुत्रांचे कैवारी, शेतकऱ्यांचा बुलंद आवाज, आमदार, खासदार ते महाराष्ट्र विधानसभा विरोधी पक्ष नेते राहिलेले दि.बा. पाटील साहेब यांच्या तेराव्या पुण्यतिथी निमित्त विद्यालयाचे माजी चेअरमन, शिक्षणप्रेमी रायगड विभागाच्या समन्वय समितीचे सदस्य स्वामी अप्पा म्हात्रे साहेब, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगडचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, ज्येष्ठ शिक्षक गावंड, खुटले सर उपस्थित होते.




विद्यार्थी मनोगतातून स्वरांजली खरात, शर्मिला परिहार, वेदांत जाधव यांनी दि.बा.पाटील ब यांचे बालपण, राजकीय कार्य, सामाजिक कार्याची माहिती दिली. शिक्षक प्रतिनिधी दीपक खुटले यांनी दि.बा.पाटील यांच्या भूमिपत्रांच्या साठीच्या लढ्याविषयी माहिती मनोगतातून सांगितली. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा विभागीय अधिकारी कोंगेरे एम. के. यांनी दि. बा.पाटील साहेब यांच्या कार्याची माहिती देताना रयत शिक्षण संस्थेतील त्यांचे योगदानाबद्दल महत्त्व सांगितले.

कार्यक्रमांचे अध्यक्ष विद्यालयाचे माजी चेअरमन, शिक्षणप्रेमी स्वामी म्हात्रे यांनी आपल्या भाषणातून नेता कसा असावा हे सांगितले तसेच कामोठे गाव आणि दि.बा.पाटील साहेब यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.




## नितीन ठाकरे सहाय्यक पोलीस आयुक्तपदी



**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांची साहाय्यक पोलीस आयुक्त पदावर बढती करण्यात आली आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे पोलीस दलात तसेच पनवेल परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. व त्यांना नवी मुंबई आयुक्त कार्यालय येथे बढती देण्यात आली आहे.




**पनवेल : भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी पनवेल भाजप संपर्क कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपमहापौर प्रमिला पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, ॲड. प्रतिभा भोईर, मनाली ठाकूर उपस्थित होत्या.**

# उरण रेल्वेस्थानकात पावसाचे पाणी शिरले

**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबई आणि मुंबईला जोडणाऱ्या पोर्ट लाईनवरील उरण रेल्वे स्थानकातील अंडरग्राउंड (भुयारी) मार्गात आज पुन्हा एकदा पावसाचे पाणी शिरल्याची गंभीर घटना घडली आहे. मागील वर्षीच्या अनुभवातून रेल्वे प्रशासनाने कोणताही धडा न घेतल्याने आज पुन्हा एकदा प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.



प्रशासनाने खबरदारी म्हणून आणलेले पाण्याचे पंप केवळ 'दिखावा' ठरल्याने रेल्वेच्या कामांमधील त्रुटी चव्हाट्यावर आल्या आहेत. या परिस्थितीमुळे रेल्वे प्रशासनाची कमालीची धावपळ उडाली, तर प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

उरण रेल्वे सेवा सुरू झाल्यानंतर मागील वर्षीच्या पावसाळ्यातही या स्थानकाच्या अंडरग्राउंड भागात ४ ते ५ फुटांपर्यंत पाणी साचले होते. त्यावेळी तरुणांनी स्थानकात पोहण्याचा आनंद लुटल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते आणि रेल्वेच्या नियोजनशून्य कारभाराची पोलखोल झाली होती.या पार्श्वभूमीवर, मध्य रेल्वेने कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करण्याऐवजी केवळ पाणी उपसण्यासाठी पंप सज्ज ठेवले होते.

## संपादकीय

# अस्वस्थ करणारी मानसिकता

लोहगड किल्ल्याच्या परिसरात घडलेली तरुणाच्या हत्येची घटना सगळ्यांनाच विचारात पाडणारी व अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. अलिकडच्या काळात वैयक्तिक नातेसंबंधांमधून उद्‌भवणाऱ्या हिंसक घटनांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. ही गुन्हेगारी प्रवृत्ती हा निव्वळ ओटीटीवरील क्राइम थ्रिलर्स अति पाहिल्याचा दुष्परिणाम समजायचा? की अवघी विधिनिषेधशून्यता?

**लोहगडावरून पाय घसरून दरीत पडलेल्या केतन अगरवाल या तरूणाचा मृत्यू अपघाताने झाला नसून तो घातपात असल्याची शक्यता पोलिस तपासात समोर आली आहे. या तरुणाची नियोजित वधू सिया गोयल हिने तिच्या प्रियकरासह कट रचून या तरूणाचा खून केल्याचा उलगडा पोलिसांनी केला आहे. या दोघांनाही पोलिसांनी अटक केली असून त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे समजते. मात्र नंतर आरोपीच्या वकिलांनी तो अपघातच असल्याचा दावाही केला आहे. पुढील सुनावणीत अधिक पुरावे समोर येऊन खरे काय ते उजेडात येईलच, पण या घटनेच्या निमित्ताने अनेक प्रश्न मात्र उपस्थित झाले आहेत. संबंधित दोन्ही तरूण व ती तरूणी उद्योजक कुटुंबातील आहेत. कोट्यवधी रूपये खर्चून लग्नाची तयारी सुरू असताना ही हत्येची घटना घडली असून, लग्नासारखे आयुष्यभराचे नाते ठरवण्याच्या आपल्या पारंपरिक पद्धतीबद्दल त्यामुळे गंभीर प्रश्न उपस्थित होतात. मृत मुलाने वडिलांकडे मुलीबद्दल शंका उपस्थित केली होती असेही आता सांगितले जाते आहे. त्याला तिच्याबद्दल शंका होती व तिचे अन्य तरूणाशी प्रेमसंबंध होते तरी त्या दोघांनीही या लग्नाला संमती का दिली व पुढील गाठीभेटी का सुरू ठेवल्या हा मोठा प्रश्न आहे. आपल्याला हे लग्न करायचे नाही असे पालकांना सांगण्याचा मोकळेपणा दोघांकडेही का नव्हता? दोघेही सुशिक्षित होते तरी त्यांच्यावर लग्नासाठी इतका कौटुंबिक दबाव होता की त्यांनी त्यासमोर मान तुकवली? ती तरूणी हत्येचा कट रचू शकली पण उघडपणे घरच्यांना आपल्या प्रियकराविषयी का सांगू शकली नाही हा तर सगळ्यांनाच पडलेला प्रश्न आहे. प्रत्यक्षात हे लग्न करायचे नसताना ती समाजमाध्यमांवर मात्र या नात्याविषयीचे छान-छान फोटो, व्हिडिओ टाकत होती हा विरोधाभासही खटकणाराच. की ते सारे हत्येच्या कटाचा एक भागच होते म्हणायचे? सुशिक्षित तरूणतरूणींमध्ये ही अशी गुन्हेगारी प्रवृत्ती येते कुठून? आपले कारस्थान लपून राहील असे त्यांना कशाच्या आधारावर वाटते? गुन्हा उघडकीस येईल याची भीती का वाटत नाही? समोरील प्रश्न सोडवण्याचे अन्य सरळसाधे मार्ग हत्येपेक्षा अधिक अवघड का वाटत असावेत? सगळेच गोंधळून टाकणारे आहे. कुणाचा जीव घेणे यांना इतके सोपे कसे वाटते? काय भले, काय बुरे याचे काहीच भान नसावे? मग आपल्या शिक्षणातून काय संस्कार होतो म्हणायचे? कुठली नैतिकता वा वैचारिकता देते आपले उच्च शिक्षण? की निव्वळ त्या-त्या शाखेअंतर्गतची कौशल्ये शिकवली जातात? आपल्याला जे हवे ते साध्य करायचे, मग त्यासाठी कुठलाही मार्ग निवडला तरी चालते अशी ही वृत्ती कुठून आणि कशातून निर्माण होते आहे? मृत तरूणाच्या वडिलांनीही कौटुंबिक संस्कारांबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून एकंदरच समाजाच्या मानसिक आरोग्याबाबत आणि बदलत्या सामाजिक मूल्यांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी ही घटना आहे.**

# माहितीचा अधिकार कायद्यातील बदल

१२ ऑक्टोबर २००५पासून माहितीचा अधिकार कायदा संपूर्ण देशामध्ये लागू झाला. जवळपास हा कायदा लागू होऊन वीस वर्षे पूर्ण झालेली आहेत. या कायद्यान्वये अनेक नागरिकांना माहिती मिळाली, न्याय मिळाला तसेच प्रशासनामध्ये पारदर्शकता निर्माण झाली. प्रशासकीय कामकाज करतांना आपण करीत असलेल्या कामकाजाची माहिती जनतेला आपण देय आहोत, अशी भावना प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली. त्यामुळे प्रशासनात गतिमानता आली. गतिमानतेसोबत पारदर्शकता आली, पारदर्शकतेमुळे भ्रष्टाचाराला आळा बसला.

माहिती अधिकार कायद्यातील काही बाबी अधिक सुस्पष्ट करण्याकरिता आणि माहिती देताना माहिती अधिकाऱ्याने कशा प्रकारे माहिती द्यावयाची तसेच अर्जदाराने सुद्‌धा अर्ज करतांना काय काळजी घ्यावी, यासोबतच फीमध्ये वाढ आदी बाबी महाराष्ट्र शासनाने राजपत्र असाधारण भाग – चार 'अ', दिनांक १२ जून २०२६ रोजी अधिसूचना प्रकाशित केली आहे. या राजपत्रामध्ये प्रकाशित केल्यानुसार माहिती अधिकार कायद्यामध्ये झालेले बदल सर्वसामान्यांपर्यंत पोहचावे याकरिता सदर लेख लिहीत आहे.




महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या अधिसूचनेमध्ये विविध व्याख्या दिल्या असून माहिती मागण्याची कार्यपद्‌धती यापूर्वीच्या कायद्यामध्ये कलम ६ (१) अन्वये अर्जदार साध्या कागदावर अर्ज करु शकत होता, ती कायम ठेवण्यात आली आहे. आधी त्याला १० रुपये फी स्वरुपात भरावे लागायचे, त्यात आता वाढ करण्यात आली असून ३० रुपये अर्ज शुल्क अर्जदाराला भरावे लागणार आहे. माहिती पुरविण्याच्या शुल्कामध्येसुद्‌धा वाढ करण्यात आली आहे. प्रत्येक कागदावरील पृष्ठासाठी पाच रूपये, आकारा मोठा असेल तर छायाप्रतीचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत, नमुने किंवा प्रतीकृती असतील तर त्याचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत, डिजिटल/स्कॅन प्रतीपृष्ठासाठी पाच रुपये, प्रकाशन असेल तर निश्चित केलेली किंमत किंवा प्रत्येक पृष्ठासाठी पाच रुपये, अभिलेखाचे निरीक्षण करावयाचे असल्यास पहिला तास विनाशुल्क आणि त्यानंतरच्या प्रत्येक तासाकरीता ५० रुपये शुल्क. याशिवाय टपाल आकारासाठी ५० रुपये किंवा जास्त माहिती असल्यास टपालाकरिता येणारा प्रत्यक्ष खर्च अर्जदाराला भरावा लागेल. हा बदल यामध्ये करण्यात आलेला आहे.

दारिद्र्यरेषेखालील अर्जदाराला कुठलेही शुल्क असणार नाही, परंतु त्याला अर्जासोबत शासनाने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी लागेल आणि त्याला विपुल प्रमाणात माहिती द्यावयाची झाल्यास पहिली ५० पृष्ठे विनामूल्य पुरवावी लागेल. त्यानंतरच्या प्रत्येक पृष्ठाकरीता पाच रुपये शुल्क आकारल्या जाणार आहे. शुल्क प्रदान करण्याची पद्‌धत यापूर्वी ज्या पद्‌धतीने होती तशीच कायम ठेवली असून त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्‌वारे किंवा युपीआयद्‌वारे आता समाविष्ट करण्यात आले आहे.

अर्जदार माहिती मागतांना एकाच अर्जामध्ये अनेक विषयांची माहिती मागतात. परंतू आता कलम ६ अन्वये माहितीसाठी लेखी स्वरुपात केलेल्या अर्जामध्ये एकाच विषयासंबंधात माहिती साधारणपणे १५० पेक्षा अधिक शब्दांची असणार नाही आणि एका पेक्षा अधिक विषयांची माहिती अर्जदाराला एका अर्जात मागता येणार नाही. अधिक विषय असल्यास प्रत्येक विषयाकरीता अर्जदाराला स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल, अशी तरतूद त्यात करण्यात आली आहे.

### नागरिकत्व सिद्‌ध करणाऱ्या ओळख पुराव्याची आवश्यकता

या अधिसूचनेमध्ये बदल करण्यात आला असून यापूर्वी अर्जदार केवळ अर्ज करु शकत होता, परंतु आता अर्जदाराला अर्जासोबत छायाचित्र असलेल्या ओळख पुराव्याची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी लागणार आहे. जर अर्जदाराने अर्जासोबत ओळख पुरावा जोडला नाही, तर जनमाहिती अधिकारी तो अर्ज अर्जदाराला परत करु शकेल. हा नव्याने बदल यामध्ये करण्यात आलेला आहे. तसेच अर्जदार एकच माहिती वारंवार मागत असेल आणि याआधी माहिती अधिकायाने अर्जदाराला ती माहिती दिली असेल, तर माहिती अधिकारी तो अर्ज निकालात काढू शकेल.

माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ (१) (त्र) नुसार केवळ सार्वजनिक कामकाजाशी किंवा सार्वजनिक हिताची माहिती मागू शकेल. व्यक्तीच्या खाजगी गोष्टीमध्ये विनाकारण हस्तक्षेप होईल, अशी वैयक्तिक स्वरुपाची माहिती यापूर्वी मागण्याची सुट होती, परंतु यामध्ये एक असा बदल करण्यात आला आहे की, सार्वजनिक हित आणि वैयक्तिक स्वरुपाची माहिती उघड करणे कसे समर्थनीय आहे, अशा खात्रीची लेखी स्वरुपात नोंद आणि वैयक्तिक माहिती उघड करण्यामध्ये कसे व्यापक सार्वजनिक हित आहे, हे सिद्‌ध करण्याची जबाबदारी आता माहिती मागणाऱ्या अर्जदारावर असणार आहे. केवळ सार्वजनिक हिताचे ठाम विधान पुरेसे असणार नाही. हा नवीन बदल माहिती अधिकारी आणि अर्जदाराने लक्षात घ्यावयाचा आहे.

### प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे करावयाचे अपील

अर्जदाराने केलेल्या अर्जावर माहिती अधिकायाने माहिती दिली नसेल किंवा दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान झाले नसेल, तर अर्जदार प्रथम अपील कलम १९ (१) अन्वये दाखल करु शकेल. त्याकरिता आता शुल्कामध्ये वाढ करण्यात आली आहे. आधी २० रूपये असलेले शुल्क आता ५० रूपये करण्यात आले आहे. याशिवाय प्रथम अपिलाचा अर्ज दाखल करतांना अर्जदाराने यापूर्वी माहिती अधिकायाकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, त्यावर माहिती अधिकायाकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, अपिलामध्ये नमूद केलेल्या दस्तऐवजांची सूची व इतर बाबींचा उल्लेख त्यामध्ये केलेला आहे याची दखल सुद्‌धा अपिलकत्र्याला घ्यावयाची आहे.

### राज्य माहिती आयोगाकडे अपील

अर्जदाराने माहिती मागण्याकरिता अर्ज केला, त्यानंतर प्रथम अपील दाखल केले, यावरुनही त्याचे समाधान झाले नसेल, तर अर्जदाराला द्‌वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्याचा अधिकार कलम १९ (३) नुसार आहे. यापूर्वी असलेल्या २० रूपये शुल्कावरुन आता हे शुल्क १०० रूपये करण्यात आले आहे. द्‌वितीय अपील दाखल करतांना अर्जदाराला स्वयंसाक्षांकित केलेले दस्तऐवज जोडावयाचे आहे. त्यामध्ये माहिती अधिकायाकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, त्यांच्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, प्रथम अपिलीय अधिकायाकडे केलेल्या अपिलाची प्रत, अपील सादर केल्याचा पुरावा, प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडून मिळालेल्या आदेशाची मूळ प्रत व त्यावर विसंबून असलेल्या दस्तऐवजांची सूची आदींची माहिती तीन प्रतीमध्ये राज्य माहिती आयोगाकडे अर्जदाराला दाखल करावयाची आहे. हा बदल नव्याने करण्यात आला आहे.

राज्य माहिती आयोगाच्या अधिकायाला जर या अपिलामध्ये त्रुटी आढळून आली, तर अपिलकत्र्यास त्रुटी दूर करण्यासाठी अपील परत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. पंधरा दिवसाच्या आत त्रुटीविरहीत अपील दाखल करण्यास मुभा दिली आहे. यात आणखी महत्वाचा बदल केला आहे, तो असा की अपिलकत्र्यास किंवा तक्रारदारास किंवा प्रतिवादीस अपिलाच्या किंवा तक्रारीच्या सुनावणीवेळी स्वतः किंवा त्याच्या यथोचित प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत आयोगाकडे उपस्थित राहण्याचा स्वेच्छाधिकार दिला आहे. याशिवाय अपिलकत्र्यास अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती विधी व्यवसायी असला पाहिजे, ही अट काढून टाकली आहे.

### अपील मागे घेणे किंवा रद्द करणे

अपिलकत्र्याने आयोगास अपील मागे घेण्याबाबत लेखी विनंती केली असल्यास आयोग अपील मागे घेण्यास परवानगी देवू शकेल. परंतू आयोगाने अपिलाच्या सुनावणीची नोटीस जारी केली आणि त्यानंतर अपिलकत्र्याने अपील मागे घेण्याची लेखी विनंती केली असेल, तर आयोगाची संसाधने व खर्च वाया घालाविल्याबद्दल आयोग अपिलकत्र्यावर वाजवी खर्च लादू शकेल आणि जमीन महसूलाची थकबाकी असल्यासारखी त्याची वसूली करु शकेल, ही नव्याने तरतूद अंतर्भूत केली आहे.

सर्वसामान्यांना महाराष्ट्र शासनाने नव्याने केलेल्या बदलाची माहिती व्हावी, या उद्देशाने ही माहिती या लेखाद्‌वारे देण्याचे प्रयोजन आहे.

**-डॉ. विलास नांदुरकर**

(लेखक हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी व नोडल अधिकारी असून माहिती अधिकार कायद्याचे तज्ज्ञ आहेत.)



## बदलते तंत्रज्ञान

# ॲमेझॉनच्या आयफोन एअरवर तगडे डिस्काऊंट

ॲपलच्या आगामी आयफोन एअर २ संदर्भातील चर्चा जोरात सुरू असतानाच सध्या बाजारात उपलब्ध असलेला आयफोन एअर अगदी स्वस्तात खरेदी करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ॲमेझॉनवर आयफोन एअरच्या खरेदीवर २२ हजारांपेक्षा जास्त डिस्काऊंट मिळत आहे. शिवाय, निवडक बँकच्या क्रेडिट कार्डधारकांना अतिरिक्त सूट दिली जात आहे. प्रीमियम स्मार्टफोन खरेदी करण्याचा विचार करणाऱ्यांसाठी ही एक उत्तम संधी मानली जात आहे.



भारतात आयफोन एअर एक लाख १९ हजार ९०० रुपयांत लॉन्च करण्यात आला, मात्र ॲमेझॉनवर हा फोन सध्या ९६ हजार ९९० रुपयांत विक्रीसाठी उपलब्ध आहे. म्हणजेच ग्राहकांना थेट २२ हजार ९१० रुपयांची सवलत मिळत आहे. याशिवाय, एसबीआय, एक्सिस आणि आयसीआयसी बँकच्या क्रेडिट कार्डद्‌वारे पेमेंट केल्यास ग्राहकांना चार हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त डिस्काउंट मिळू शकतो. त्यामुळे फोनची किंमत ९२ हजार ९९० रुपयांपर्यंत कमी होऊ शकते.

एक्स्चेंज ऑफर आणि ईएमआयचा पर्याय

ॲमेझॉन या फोनवर ग्राहकांना ईएमआयचा पर्यायही देत आहे. ग्राहक दरमहा तीन हजार ४१० रुपये ईएमआयचा पर्याय निवडू शकतात तसेच जुना स्मार्टफोन एक्सचेंज केल्यास ३९ हजार ५० रुपयांपर्यंत एक्स्चेंज बोनस मिळू शकतो, मात्र एक्स्चेंजची जुन्या फोनचा ब्रँड, मॉडेल आणि स्थिती यावर अवलंबून असेल.

खरेदीसाठी योग्य वेळ?

हलका, स्टायलिश डिझाइन, फ्लॅगशिप दर्जाची कामगिरी आणि सध्या सुरू असलेल्या आकर्षक ऑफर्समुळे आयफोन एअर खरेदी करण्यासाठी हा योग्य काळ मानला जात आहे. ज्यांना ॲपल इकोसिस्टमचा अनुभव घ्यायचा आहे, त्यांच्यासाठी ही डील फायदेशीर ठरू शकते.

ॲमेझॉन सुरू असलेल्या सेलमध्ये ग्राहक आयफोनसह अँड्रॉईड स्मार्टफोन सॅमसंग गॅलेक्सी एस २५ प्लस, सॅमसंग गॅलेक्सी एस २५ अल्ट्रा आणि शाओमी १४ अल्ट्रा यांसारखे स्मार्टफोन स्वस्तात खरेदी करू शकतात.

# क्रांतिकारक दामोदर हरि चापेकर

हरिभाऊ चापेकर या एका कीर्तनकारांच्या घरी २५ जून १८६९ रोजी दामोदर चाफेकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टिळकांच्या विचारांचा प्रभाव दामोदर यांच्यावर होता. लहानपणापासूनच दामोदर चापेकर यांना व्यायामाची आवड होती. समवयस्क मित्रांना संघटित करून त्यांनी एक व्यायामशाळा सुरू केली. इंग्रजांकडून करण्यात येणार्या अत्याचाराची दामोदरपंतांना मनस्वी चीड होती. दामोदरपंतांचे लहान भाऊ बाळकृष्ण हरि चापेकर व वासुदेव हरि चापेकर दोघेही त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत होते.



या तिन्ही भावांना चापेकर बंधू नावाने ओळखले जाते. हे तिन्ही भाऊ लोकमान्य टिळक यांच्या संपर्कात होते. टिळकांना ते गुरू मानत असत. त्यांचे वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यामुळे चापेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. विठ्‌ठलभक्ती करणार्या या मराठी कुटुंबाने देशासाठी प्राण अर्पण करणारे ३ तरणीबांड मुलेही दिली.

पुण्यामध्ये १८९७मध्ये प्लेगची साथ आली. प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोध मोहीम उघडली आणि अत्याचाराचा कहर केला. यामुळे इंग्रजांविरोधात असंतोष पसरू लागला. तत्कालीन जिल्हाधिकारी वाल्टर चार्ल्स रँड हा अत्यंत क्रूर, खुनशी होता. पुण्याच्या नागरिकांवर अत्याचार करण्यात तो सर्वात पुढे होता. बाळ गंगाधर टिळक आणि आगरकर यांनी या अत्याचाराविरोधात टीका केली. यामुळे त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. दरम्यान, दामोदरपंतांनी रँडची हत्या करण्याची योजना आखली. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत रँड आणि त्याचा सहकारी लेफ्लनंट आयस्टर यांची एका कार्यक्रमाहून परतत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

गणेश आणि रामचंद्र या द्रविड बंधूंनी केलेल्या गद्दारीमुळे इंग्रजांना हल्लेखोरांची नावे कळाली आणि त्यांनी दमोदरपंतांना अटक केली. त्यानंतर काही दिवसातच बाळकृष्ण व वासुदेव चापेकर, तसेच महादेव रानडे या सर्वांनाच पकडण्यात आले. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरुंगात फाशी दिली. त्यानंतर वासुदेव चापेकरांना ८ मे १८९९ रोजी तर बाळकृष्ण चापेकरांना आणि महादेव रानड्यांना १० मे १८९९ रोजी फाशी देण्यात आली.

येरवडा तुरुंगात असताना त्यांनी आपला जीवन प्रवास आणि क्रांतीकार्याचे तपशील नमूद करणारे १०० पानी आत्मवृत्त मोडीत लिहून काढले. ते वि.गो.खोबरेकर यांनी संपादित करून मराठीत आणले. १९७४ साली ते राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने प्रकाशित केले. मुळात हे आत्मवृत्त म्हणजे खून करण्यास चापेकर का व कसे प्रवृत्त झाले याची हकीकत लिहिण्यास त्यांना सांगण्यात आले व येरवाडा जेलमध्ये असताना त्यांनी ८ ऑक्टोबर १८९७ रोजी ते पूर्ण केले. हे आत्मवृत्त एकूण मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एकतर एका निधड्या छातीच्या क्रांतिकारकाचे मोकळे ढाकळे आत्मवृत्त आहे. आपण क्रांतिकारक कसे होत गेलो, त्याचे क्रमवार वर्णन चापेकरांनी त्यात केले आहे. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे शरीरात होतात 'हे' परिणाम

आपल्या शरीरात काही पोषक तत्व कमी होतात, तेव्हा त्याची बरीचशी लक्षणं शरीरात दिसू लागतात. वेगवेगळ्या समस्या होऊ लागतात. आयर्न शरीरातील महत्वाच्या मिनरलपैकी एक आहे. हिमोग्लोबिन तयार करण्यात मदत करतं. हिमोग्लोबिन रेड ब्लड सेल्समध्ये असलेलं असं प्रोटीन आहे, जे शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांपर्यंत ऑक्सिजन पोहचवण्याचं काम करतं. जेव्हा शरीरात आयर्न कमी होतं. तेव्हा पुरेसं हिमोग्लोबिन तयार होत नाही आणि ॲनिमियाचा धोका वाढतो.आयर्न कमी झाल्याचं सगळ्यात मोठं लक्षण हे थकवा जाणवणं असतं. जेव्हा शरीरातील अवयवांपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहचत नाही, तेव्हा एनर्जी लेव्हल कमी होऊ शकते. जर पुरेसा आराम करूनही कमजोरी, सुस्ती किंवा थकवा जाणवत असेल तर आयर्न कमी झालेलं असू शकतं.



हिमोग्लोबिन कमी झाल्याचा प्रभाव त्वचेवरही दिसू लागतो. आयर्न कमी झाल्यावर चेहरा सामान्यापेक्षा जास्त पिवळा दिसू लागतो. काही लोकांमध्ये ओठ, हिरड्या आणि डोळ्यातही पिवळेपणा दिसतो. या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. वेळीच डॉक्टरांना संपर्क करावा.

हलकं काम करतानासुद्‌धा श्वास भरून येतो. पायऱ्या चढताना किंवा थोडं चालल्यावरही थकवा जाणवतो. त्याशिवाय काही लोकांना चक्कर येणे किंवा डोकं हलकं होण्यासारख्या समस्याही जाणवू शकतात.

आयर्न कमी झाल्याचा प्रभाव केसांवर आणि नखांवरही दिसून येतो. अनेक महिलांचे केस जास्त प्रमाणात गळतात किंवा केस पातळ होतात. नखं कमजोर होतात आणि सहजपणे तुटतात. काही केसेसमध्ये नखांचा आकार बदलू शकतो. हा आयर्नच्या कमतरतेचा संकेत असू शकतो.

आयर्न कमी झाल्यावर मेंदूपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहचत नाही, ज्यामुळे डोकेदुखीचा त्रास वाढतो. काही लोकांना फोकस करण्यास अडचणे येते किंवा मानसिक थकवा जाणवतो. जर आपल्याला पुन्हा पुन्हा हे संकेत दिसत असतील तर शरीरात आयर्न कमी झालेलं असू शकतं.

महिलांमध्ये आयर्नची कमतरता पुरूषांच्या तुलनेत जास्त बघायला मिळते. मासिक पाळी, गर्भावस्था, स्तनपान आणि पोषणासंबंधी कारणं याची मुख्य कारणं असू शकतात. जर वेळीच आयर्न कमी झाल्याची लक्षणं ओळखली, तर होणाऱ्या समस्या सहज टाळता येतात.

# रोह्यात पावसाचे आगमन; शेतीकामांना वेग



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात अखेर मान्सूनचे आगमन झाल्याने बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना वेग दिला असून सध्या शेतशिवारात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. यंदा पावसाने शेतकऱ्यांची चांगलीच परीक्षा घेतली. एरवी रोहा तालुक्यात मान्सून ७ जूनच्या आसपास दाखल होतो, तर गेल्या वर्षी तब्बल १५ मे रोजीच पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे यंदाही त्याच धर्तीवर पाऊस सुरू होईल, असा अंदाज शेतकऱ्यांनी बांधला होता. मात्र, यावर्षी २० जून उलटून गेल्यानंतरही समाधानकारक पाऊस झाला नव्हता. परिणामी शेतकरी चिंतेत सापडले होते.पावसाअभावी खरीप हंगामावर परिणाम होणार की काय, अशी भीती व्यक्त केली जात होती. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत, नांगरणी व इतर कामे पूर्ण केली होती. मात्र, पावसाने साथ न दिल्याने पेरणी रखडली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल दीड ते सव्वा महिन्यांच्या विलंबाने मान्सून दाखल झाल्याने शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडले होते.

२२ व २३ जून रोजी तालुक्यात झालेल्या पावसामुळे परिस्थितीत बदल झाला. पावसाच्या सरींनी शेतजमिनींना ओलावा मिळाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा जोमाने कामाला सुरुवात केली. बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा समाधान आणि आशेचे हास्य उमटले आहे.तालुक्यातील बहुतांश भागात पेरणी पूर्ण झाली असून उर्वरित सुमारे ४० टक्के शेतकऱ्यांनीही आता पेरणीच्या कामांना सुरुवात केली आहे. भात, नाचणी, वरी यांसह विविध खरीप पिकांच्या पेरणीसाठी शेतकरी शेतात उतरले आहेत. ग्रामीण भागात संपूर्ण कुटुंब शेतात राबताना दिसत असून खरीप हंगामाची लगबग सर्वत्र सुरू झाली आहे.दरम्यान, पुढील काळात पाऊस नियमित व समाधानकारक पडावा, पिकांना भरघोस उत्पादन मिळावे आणि

बळीराजाचे चांगले दिवस यावेत, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. निसर्गाला साकडे घालत आता तरी पावसाने साथ द्यावी, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## जिल्हा पोलीस पाटील संघटनेने घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

**चौक : प्रतिनिधी**

संपूर्ण रायगड जिल्ह्यातील गाव पोलीस पाटील यांनी रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटनेच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांची भेट घेऊन आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिले.

रायगड जिल्ह्यातील गाव पोलीस पाटील यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांची भेट घेऊन रखडलेले मानधन, नवीन पोलीस पाटील भरती आणि ईतर न्याय मागण्या बाबत सविस्तर चर्चा केली.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची भेट महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव कोलते पाटील व दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत चेरफळे, खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे यांच्या समवेत भेट घेतली. यावेळी पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांनी सकारात्मक चर्चा करून योग्य मार्गदर्शन केले असे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. त्या नंतर रायगड जिल्हा अधिकारी किशन जावळे यांचीही भेट घेतली.



## मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षक पुरस्कार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी जून 2026 महिन्यासाठी मध्य रेल्वेच्या 11 कर्मचाऱ्यांना त्यांच्या सतर्कतेबद्दल, कर्तव्यनिष्ठेबद्दल आणि रेल्वेच्या सुरक्षित परीचालनासाठी केलेल्या समयसूचक कार्यवाहीबद्दल 'संरक्षा पुरस्कार' देऊन सन्मानित केले आहे.कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांनी दाखवलेली समयसूचकता आणि समर्पण वृत्ती यांच्या कौतुकार्थ हे संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यास आणि प्रवासी व रेल्वे परीचालनाची संरक्षा सुनिश्चित करण्यास मदत झाली. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट संरक्षा कार्याचा गौरव करणारा लेख आणि रोख बक्षीस यांचा समावेश आहे.



पुरस्कार विजेत्यांमध्ये मुंबई विभाग (6 पुरस्कार विजेते) यामध्ये मिलिंद खंडागळे, लोको पायलट लोणावळा, दशरथ सिंग, ट्रेन मॅनेजर पनवेल, गौरव कुमार, रेल्वे उपव्यवस्थापक कर्जत, हरिकृष्ण रेरे, मास्टर क्राफ्ट्समन (C&W), लोकमान्य टिळक टर्मिनस, नितेश कुमार यादव, इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर (S&T विभाग) कळवा, संतोष जी. जाधव, इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर (S&T विभाग) दादर, पुणे विभागात (2 पुरस्कार विजेते) यामध्ये एस. के. मंडल, लोको पायलट शंटर मिरज, डी. टी. कोकले, हेड कॉन्स्टेबल, आरपीएफ सातारा, भुसावळ विभाग (2 पुरस्कारप्राप्त) यामध्ये रवींद्र गणवीर, तंत्रज्ञ, भुसावळ यार्ड, बळीराम शंकर चौधरी, गेटमन, बडनेरा, नागपूर विभागात (1 पुरस्कारप्राप्त) यामध्ये सुरेश चंद मीना नागपूर विभागातील हिंगणघाट स्टेशन व्यवस्थापक यांचा समावेश आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**रायगड : अलिबाग**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त आणि मंत्रालय स्तरावर राबविण्यात येत असतो. त्यानुसार जिल्हास्तरावरील माहे जुलै 2026 चा लोकशाही दिन सोमवार दि.6 जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी 1.00 वा. राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. अर्जदाराने आपल्या वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारीचे निराकरण करण्याकामी लोकशाही दिनाकरिता अर्ज विहित नमुन्यात 15 दिवस आधी 2 प्रतीत पाठविणे.

# अमृत मानस मित्र प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची संधी!

**रायगड : अलिबाग**

मानस मित्र प्रशिक्षण नेमकं काय आहे? विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृत (AMRUT) यांच्या वतीने "अमृत मानसमित्र" समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH), पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे. हा अभ्यासक्रम मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, Active Listening, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मानससामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित असून सहभागी उमेदवारांना प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

15 दिवसांचे ऑफलाइन प्रशिक्षण, अधिकृत प्रमाणपत्र, फील्ड प्लेसमेंट व रोजगारक्षम कौशल्य विकासाची संधी हे प्रमुख वैशिष्ट्ये आहे.अधिकृत प्रमाणपत्र- प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अमृत व महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

प्रशिक्षणाचे स्वरूप- पुणे येथे प्रथम 15 दिवसांचे ऑफलाइन प्रशिक्षण, Interactive Sessions, Case Studies, Practical Activities आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन. त्यानंतर एक महिना प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर ( यात जिल्हा पातळीवर एका शाळा महाविद्यालयाला जोडून देण्यात येईल) त्यानंतर 3 ते 5 महिने प्रत्यक्ष व्यवसायासाठी MIMH चे monitoring, mentoring, नियमित ऑनलाईन सत्र आणि प्रत्यक्ष अडचणीचे निवारण आणि मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष व्यावसायिक सहाय्य, असे सर्वसाधारण स्वरूप आहे. प्रशिक्षण कोण घेणार? संपूर्ण प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे घेतले जाईल. त्याचप्रमाणे अमृतमार्फत विविध तज्ञ मार्गदर्शकाचे वेळोवेळी अनुभवाधारित प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि सहकार्य मिळणार आहे.प्रशिक्षणानंतर काय?प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH) च्या तज्ज्ञांकडून नियमित ऑनलाइन मार्गदर्शन दिले जाईल. यामध्ये केस डिस्कशन,नियमित ऑनलाइन सुपरव्हिजन,Mentoring Sessionsप्रत्यक्ष कामातील अडचणींचे निराकरण, व्यावसायिक मार्गदर्शन,कौशल्य वृद्धीसाठी सतत Hand-holding Support यांचा समावेश असेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020-राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) नुसार कौशल्याधारित शिक्षण, समाजाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगारक्षमतेवर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या समुपदेशना ची तरतूद आहे.

रोजगार व करिअर संधी-अमृत मानस मित्र उपक्रमात मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्य करण्याची संधी, मानसिक आरोग्य क्षेत्रातील रोजगारक्षम कौशल्ये, सामाजिक संस्थांमधील रोजगाराची संधी आणि व्यावसायिक नेटवर्किंग अशा विविध संधी उपलब्ध आहेत.

पात्रता निकष-खालीलपैकी कोणतीही पदव्युत्तर पदवी असलेले अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवार अर्ज करू शकतात. एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र ;एम.ए./एम.एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र ;मास्टर ऑफ सोशल वर्क (MSW).या क्षेत्रात पूर्वीपासून कार्यरत व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **श्री. अनंता पुंडलिक गायकर वगैरे, रा. भिंगारवाडी, ता. पनवेल, जि. रायगड** यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताबे वहिवाटीची मिळकत असून, सदरील विद्यमान मालकांनी सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही पुर्णतः निर्वेध व निर्जोखिम असून, त्यांना सदरील मिळकत विकण्याचा, पुर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. सबब सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही करार, मदार, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी इ. अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर कोणत्याही प्रकारचे महसुली अगर दिवाणी दावे प्रलंबित असल्यास, प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. उपरोक्त मुदतीत हरकत न आल्यास, सदरील मिळकत ही पुर्णतः निर्वेध, निर्जोखीम व निष्कर्जी असून विद्यमान मालकांस तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, तसेच अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काहीएक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचाही कसलीही हरकत/तकार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

**मौजे-भिंगारवाडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| अ.क्र. | गट क. व उपविभाग | क्षेत्र हे. आर.पॉ. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ९९/१ | ०-८०-४०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकूण-०-८२-७० | अनंता पुंडलिक गायकर<br>योगेश पुंडलिक गायकर<br>वसंत वामन गायकर<br>जयंवती पाडुरंग ठोंबरे<br>सरीता द्वारकानाथ मुंढे<br>कांचन चंद्रकांत गायकर<br>प्रितम चंद्रकांत गायकर<br>प्रतिमा प्रफुल्ल ठोंबरे |

येणेप्रमाणे नोटीस दिली.

पनवेल.
दि. २५/०६/२०२६.

सही/-
**ॲड.एस.के. राणे.**

**पत्ता -** शॉप नं.१२३, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल-४१०२०६, जि. रायगड. मो.नं. ९८१९८६९२१२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे बोर्ले, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ११० | एकूण ०-१६-००<br>पैकी ०-०८-०० | ०.५३<br>०.२६ | मनिषा गंगाराम पाटील<br>कल्याणी पुंडलिक पाटील<br>मथुरा पुंडलिक पाटील<br>केवल पुंडलिक पाटील<br>जनाबाई लक्ष्मण माळी<br>शांताबाई विष्णू मुंढे<br>निधी नितिन गायकर<br>दिनेश अर्जुन पाटील<br>सुषमा अर्जुन पाटील<br>संदिप काशिनाथ मुंढे<br>अश्विनी अशोक खुटले |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०५ दिवसांच्या** आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २४/०६/२०२६.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक मुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे बोर्ले, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १४६/१ | ०-१३-२०<br>(पोट खराब्यासह)<br>पैकी<br>०-०६-६० | १.०३ | मनिषा गंगाराम पाटील<br>कल्याणी पुंडलिक पाटील<br>मथुरा पुंडलिक पाटील<br>केवल पुंडलिक पाटील<br>जनाबाई लक्ष्मण माळी<br>शांताबाई विष्णू मुंढे<br>निधी नितिन गायकर<br>दिनेश अर्जुन पाटील<br>सुषमा अर्जुन पाटील<br>संदिप काशिनाथ मुंढे<br>अश्विनी अशोक खुटले |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०५ दिवसांच्या** आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २४/०६/२०२६.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक मुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१


महावितरण

## ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३०, टी-३१, टी-३२, टी-३३, टी-३४, टी-३५, टी-३६ आणि टी-३७ (२०२६-२७ 3rd Call) अशा एकुण **आठ** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २५.०६.२०२६ पासून ते दि. ०१.०७.२०२६ @ १३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. ०१.०७.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल. **(सही)**

**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

शासनाच्या दि. २२.०५.२०२६ च्या पत्राला अनुसरून इरादीत तथापि वाटप न झालेल्या व इतर प्रलंबित भूखंड वाटपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम आखून नोडनिहाय शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नोड | दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | द्रोणागिरी | ०६/०७/२०२६ | १०/०७/२०२६ |
| २. | जेएनपीए | १३/०७/२०२६ | १७/०७/२०२६ |
| ३. | कामोठे/आसुडगाव | २०/०७/२०२६ | २४/०७/२०२६ |
| ४. | करंजाडे/कालुंद्रे | २७/०७/२०२६ | ३१/०७/२०२६ |
| ५. | तळोजा/खारघर/नावडे | ०३/०८/२०२६ | ०७/०८/२०२६ |
| ६. | कळंबोली/रोडपाली | १०/०८/२०२६ | १४/०८/२०२६ |
| ७. | ठाणे | १७/०८/२०२६ | २२/०८/२०२६ |

**भूमी विभाग १२.५ योजनेअंतर्गत वाटपासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | तपशील | कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | निवाडा | साक्षांकित प्रत |
| २. | सी.सी. | साक्षांकित प्रत |
| ३. | कब्जेपावती | साक्षांकित प्रत |
| ४. | ७/१२ उतारा | साक्षांकित प्रत |
| ५. | कार्यालयीन ओळखपत्र | नोटराइज्ड प्रत |
| ६. | रहिवाशी दाखला | मूळ प्रत |
| ७. | रेशन कार्ड, मतदान, ओळखपत्र पॅनकार्ड, आधार कार्ड | स्वयंप्रमाणित |
| ८. | मृत्यू दाखला (मूळ भूधारक मयत असल्यास) | साक्षांकित प्रत |
| ९. | वारस दाखला | नोटराइज्ड प्रत |
| १०. | वारस दाखल्याचे प्रतिज्ञापत्र* | नोटराइज्ड प्रत |
| ११. | वारस दाखल्याचे दिवाणी चौकशी अर्ज | कोर्टाकडील |
| १२. | हमीपत्र* | नोटराइज्ड प्रत |
| १३. | बंधपत्र* | नोटराइज्ड प्रत |
| १४. | प्रतिज्ञापत्र* | नोटराइज्ड प्रत |

(*५००/-रुपयांच्या स्टॅम्पपेपर सोबत)

उक्त नमूद कालावधीत भूधारकांनी **सोमवार ते शुक्रवार (सुट्टीचे दिवस वगळून)** दुपारी २ ते ५ या वेळेत **सिडको भवन, तळ मजला, भूमी १२.५% विभाग, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४** येथे सोबत जोडलेल्या कागदपत्रांसमवेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (ठाणे/रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१२२/२०२६-२७



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## Ramsheth Thakur College of Commerce and Science, Kharghar

**Plot No.1, Sector-33, Kharghar, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai - 410210**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2026-27**

**UN-AIDED**

| Sr. No | Cadre | Subject | Total No. of Posts | Post Reserved for |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | - | 01 | OPEN - 01 |
| 2 | Assistant Professor | Information Technology | 06 | SC/ST - 01, DT(A) - 01, OBC - 01, SEBC/EWS - 01, OPEN-02. **(Horizontal Reservation - Women - 02 Posts)** |
| 3 | Assistant Professor | Accounting & Finance | 05 | SC/ST - 01, DT(A) - 01, OBC - 01, SEBC/EWS - 01, OPEN - 01. **(Horizontal reservation women - 02 Post)** |
| 4 | Assistant Professor | B.M.S. | 06 | SC/ST - 01, DT(A) - 01, OBC - 01, SEBC/EWS - 01, OPEN - 02. **(Horizontal Reservation - Women - 02 Posts)** |
| 5 | Assistant Professor | Chemistry | 04 | SC/ST - 01, DT(A) - 01, OBC-01, OPEN-01. **(Horizontal Reservation - Women - 01 Post)** |
| 6 | Assistant Professor | Physics | 01 | SC-01 |
| 7 | Assistant Professor | Botany | 02 | SC - 01, OPEN - 01 **(Horizontal Reservation - Women - 01 Post)** |
| 8 | Assistant Professor | Mathematics | 02 | SC - 01, OPEN - 01 **(Horizontal Reservation - Women - 01 Post)** |
| 9 | Assistant Professor | Commerce | 01 | OPEN - 01 |
| 10 | Assistant Professor | Business Economics | 01 | OPEN - 01 |

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC-/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No.Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must cond their applieation through proper channel.

Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Appiications with full details should reach to the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's, Panvel, C/o Ramsheth Thakur College of Commerce and Science, Kharghar, Plot No.1,-Sector-33, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai - 410210** within 15 days from the date of publication of this advertisement.

**This is University approved advertisement.**

If required, contact - **Dr. Maheshwari Zirpe - 9769884544**
**Mr. Nitin Vaskar - 9821967877**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**Chairman**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel

# बनावट स्टे ऑर्डरप्रकरणी चौकशी करा

## विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांनी पावसाळी अधिवेशनात पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून शासनाचे लक्ष नवी मुंबईतील अवैध बांधकामांना संरक्षण देण्यासाठी कथितपणे वापरण्यात आलेल्या बनावट स्टे ऑर्डर प्रकरणाकडे वेधले.



यावेळी सभागृहात मुद्दा उपस्थित करताना त्यांनी सांगितले की, नवी मुंबईतील अवैध बांधकामांवर होणारी कारवाई रोखण्यासाठी बनावट स्टे ऑर्डरचा वापर करण्यात आल्याचा अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणातील संबंधित दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच ज्या मोबाईल क्रमांकावरून नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना बनावट स्टे ऑर्डर पाठवून कारवाई थांबविण्यात आली, त्या व्यक्तीविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. हा प्रकार केवळ एका इमारतीपुरता मर्यादित नसून, अशाच प्रकारे शेकडो अवैध इमारतींवरील कारवाई थांबविण्यात आली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही त्यांनी सांगितले.

तसेच, जर संबंधित व्यक्ती किंवा टोळी भूमाफियांना मदत करत असेल, तर अनेक सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांनी अनधिकृत इमारतींमध्ये घरे खरेदी करून आपला जीव धोक्यात घातला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या प्रकरणामागील खरे भूमाफियांचे जाळे आणि अवैध बांधकामांना मिळणारे संरक्षण उघड करण्यासाठी चौकशी (सीबीआय) मार्फत करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच सदर चौकशीतून नवी मुंबईतील शेकडो संशयित बांधकामांच्या मागे नेमके कोण आहे, हे जनतेसमोर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या गंभीर प्रकरणात शासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि अवैध बांधकामांना संरक्षण देणाऱ्या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करावा, अशी ठाम मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी पावसाळी अधिवेशनात केली.

# बेकायदा बांधकामांच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाने मागवली नावे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील बेकायदा बांधकामांच्या प्रश्नावर मुंबई उच्च न्यायालयाने महापालिका प्रशासनाकडून संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नावे मागवली आहेत. तसेच दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई प्रस्तावित आहे, याचा सविस्तर कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांना दिले.



नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामांविरोधात किशोर सुंदर शेट्टी यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका आणि त्यासंदर्भातील अवमान याचिकेवर न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी महापालिकेचे उप आयुक्त (अतिक्रमण) संजय शिंदे यांनी १५ जून रोजी दाखल केलेले अतिरिक्त शपथपत्र न्यायालयासमोर सादर केले.

महापालिकेने न्यायालयात सादर केलेल्या नवीन सर्वेक्षण अहवालानुसार शहरातील आठ प्रभागांमधील १२ हजार ६८७ इमारतींना अनधिकृत बांधकामांबाबत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यापैकी ४,९४६ इमारतींकडे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) दोन्ही नसल्याने त्या पूर्णपणे अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाले आहे. याआधी न्यायालयात सादर करण्यात आलेल्या सर्वेक्षणात शहरातील २० हजार ९८ इमारती अनधिकृत असल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यापैकी ४,९०८ इमारती पूर्णपणे बेकायदा असल्याचे सांगण्यात आले होते. नव्या सर्वेक्षणात हा आकडा ४,९४६ वर पोहोचल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

महापालिकेच्या शपथपत्रात अनेक मूलभूत प्रश्नांवरील माहिती टाळण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले. या इमारती कोणत्या कालावधीत उभ्या राहिल्या, त्या वेळी कोणते अधिकारी संबंधित विभागात कार्यरत होते, त्यांनी बांधकामे रोखण्यासाठी किंवा त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कोणती पावले उचलली, याचा तपशील शपथपत्रात नसल्याबद्दल खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. या प्रश्नांवर शपथपत्र मौन बाळगत असल्याचे नमूद करत न्यायालयाने जबाबदार अधिकाऱ्यांची नावे सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात ही बांधकामे झाली आणि ज्यांनी कारवाईत कसूर केली, त्यांच्याविरोधात कोणती कारवाई प्रस्तावित आहे, हेही स्पष्ट करण्यास सांगितले.

केवळ संबंधित अधिकाऱ्यांची नावे सादर करून भागणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने महापालिका आयुक्तांनाच या प्रकरणात भूमिका मांडण्यास सांगितले. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कोणती शिस्तभंग, दंडात्मक अथवा कायदेशीर कारवाई प्रस्तावित आहे, याचा सविस्तर कृती आराखडा अतिरिक्त शपथपत्राद्वारे सादर करावा, असे निर्देश खंडपीठाने दिले.

# मुंबई महानगर प्रदेशातील वृक्षतोड तातडीने थांबवा

## नॅटकनेक्ट फाउंडेशनचे बी.एन. कुमार यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईतील हरित क्षेत्र वाढविण्याच्या दिशेने रिलायन्स फाउंडेशनच्या प्रस्तावित कोस्टल रोड गार्डन्स प्रकल्पाचे स्वागत करत, एका आघाडीच्या पर्यावरणवादी गटाने मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) वृक्षतोडीवर संपूर्ण स्थगिती लागू करण्याची मागणी केली आहे. कोणतीही रोपलागवड मोहीम प्रौढ वृक्षांच्या पर्यावरणीय मूल्याची तत्काळ भरपाई करू शकत नाही, असे या गटाने ठामपणे नमूद केले आहे.



रोपलागवड उपक्रम कितीही स्तुत्य असले तरी ते अपरिहार्य पर्यावरणीय सेवा देणाऱ्या प्रौढ वृक्षांच्या सातत्यपूर्ण नाशाला परवाना ठरता कामा नयेत, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी वाशी येथे इंडियन वुमन सायंटिस्ट्स असोसिएशन (आयडब्ल्यूएसए) आयोजित कार्यक्रमात शास्त्रज्ञ, अभियंते आणि जैवविविधता तज्ज्ञांना संबोधित करताना सांगितले.

"रोप हे एक आश्वासन असते, तर प्रौढ वृक्ष ही जिवंत पर्यावरणीय संपत्ती असते," असे कुमार म्हणाले. बहुतेक स्थानिक वृक्षप्रजातींना त्यांचे संपूर्ण पर्यावरणीय लाभ देण्यासाठी १० ते १५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ लागतो, असे त्यांनी नमूद केले. "आज एक प्रौढ वृक्ष तोडून त्याच्या जागी रोप लावल्यास अनेक वर्षे टिकणारी पर्यावरणीय तूट निर्माण होते," असे ते म्हणाले.

"नागरी नियोजक गृहनिर्माण तूट आणि पायाभूत सुविधांच्या तुटीबद्दल बोलतात. आपण हरित क्षेत्राच्या तुटीचाही सामना करत आहोत. तोडला जाणारा प्रत्येक प्रौढ वृक्ष ही तूट वाढवतो, तर ती भरून काढण्यास एका रोपाला १० ते १५ वर्षे लागू शकतात," असे कुमार म्हणाले.

या कार्यक्रमात क्रिएटिंग लर्निंग गार्डन्स अँड लिव्हिंग म्युझियम्स बायोडायव्हर्सिटी, कॉन्झर्व्हेशन अँड सस्टेनेबिलिटी या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले.यावेळी आयडब्ल्यूएसएच्या अध्यक्षा डॉ. नूतन भाकळ यांनी मांडलेल्या संयुक्त कृतीच्या प्रस्तावाला प्रतिसाद देताना कुमार यांनी नॅटकनेक्टच्या नव्याने स्थापन झालेल्या 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' (कॅन) या आघाडीचे आयडब्ल्यूएसएसोबत सहकार्य जाहीर केले.

# वाढीव वीज बिलामुळे नागरिक संतप्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवूड्स सेक्टर-५० येथील श्री ओम सद्गुरू सोसायटी मधील वाढीव वीज बिला संदर्भात नागरिक संतप्त झाले असून त्यांनी मुख्य अभियंता, नेरुळ विभागाचे कावळे यांची भेट घेऊन पूर्वीचे वीज बिल मीटर लावण्याची मागणी केली आहे.मागील सहा महिन्यांपूर्वी सदगुरू सोसायटीत वीज बिल सुमारे २,००० येत होते, तेच बिल आता तब्बल १६,००० पर्यंत वाढल्याने रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. याबाबत दखल घेत, दोन दिवसांच्या आत वाढीव वीज बिलात योग्य ती दुरुस्ती करून जुने मीटर पुन्हा बसविण्याची मागणी करण्यात आली. श्री. कावळे यांनीही मान्य करून आवश्यक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

# शिरवणे विद्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी बलिदान दिनानिमित्त संमेलन

**नवी मुंबई :बातमीदार**

भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हाच्या वतीने तसेचभाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेज सेक्टर-२ नेरुळ येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी संस्मरण पंधरवडा २३ जून २०२६ बलिदान दिवस निमित्त जिल्हा कार्यकर्ता संमेलन आयोजित करण्यात आले.



या संमेलनाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रदेश सरचिटणीस व माजी आमदार सुनिल राणे उपस्थित होते.डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशासाठी कश्या प्रकारे बलिदान केला याची माहिती सुनिल राणे यांनी उपस्थित भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना माहिती दिली .

या प्रसंगी डॉ. राजेश पाटील यांच्या सोबत नगरसेवक, नगरसेविका, मंडळ अध्यक्ष, युवा मोर्चा, महिला मोर्चा, एस.सी मोर्चा, शक्ती केंद्रप्रमुख, बुध प्रमुख, सर्व मोर्चा, सर्व सेल, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी संमेलन दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५२ साली तत्कालीन केंद्र सरकारकडून केल्या जाणाऱ्या राष्ट्रहिताला बाधा आणणाऱ्या गोष्टींना विरोध करण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देऊन देशभर आंदोलन उभं केलं.

त्यावेळी भारताचा भाग असूनही काश्मीरमध्ये भारतीयांना जाण्यासाठी परवाना लागत असे, त्याविरोधात लढत असताना त्यांची हत्या करण्यात आली. तोच हा आजचा दिवस. या दिवसाचे महत्व सर्व कार्यकर्त्यांना व समाजातील सर्व घटकांना कळावं ,यासाठी नवी मुंबईत सर्व मंडळांमध्ये अभिवादन कार्यक्रम व संमेलन आयोजित करण्यात आले असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

# युवानिती पॉलिसी डायलॉग इनिशिएटिव्ह अंतर्गत युवा संसद उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाऊंडेशन आणि तिलक ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच MY Bharat, युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहाय्याने 'युवानिती पॉलिसी डायलॉग इनिशिएटिव्ह' अंतर्गत युवा संसद कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



या युवा संसदेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक, लोकशाही आणि विकासात्मक विषयांवर प्रभावी मांडणी करत एकूण २१ विधेयके सादर केली व ती संसदेमध्ये पारित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीमुळे आणि लोकशाही प्रक्रियेतील सक्रिय सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री अमित पुंडे, राज्य संचालक, MY Bharat, युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय, भारत सरकार उपस्थित होते. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा संसदेमध्ये सादर करण्यात आलेल्या सर्व विधेयकांचे संकलन असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच उत्कृष्ट संसदीय नेतृत्व, प्रभावी मांडणी आणि लोकशाही मूल्यांची जाण यासाठी १० विद्यार्थ्यांना 'बेस्ट पार्लमेंटेरियन अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास डॉ. पुरुषोत्तम पाटोळकर आणि डॉ. हिना समानी हे मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी इन्फिनिटी फाऊंडेशनचे अध्यक्ष अयूफ अकुला, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, विद्यार्थी प्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी तिलक ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. हिना समानी म्हणाल्या, "युवा संसद हा केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांना लोकशाहीची जाणीव, सार्वजनिक धोरणांची समज आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थी विचारपूर्वक नेतृत्व, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीची भावना आत्मसात करतात." इन्फिनिटी फाऊंडेशनचे अध्यक्ष अयूफ अकुला म्हणाले, "'युवानिती पॉलिसी डायलॉग इनिशिएटिव्ह'चा उद्देश तरुणांना केवळ चर्चेत सहभागी करून घेणे नाही, तर त्यांना धोरणात्मक विचार, संसदीय प्रक्रिया आणि लोकशाही मूल्यांशी प्रत्यक्ष जोडणे हा आहे.

युवा संसदेमधून विद्यार्थ्यांनी दाखवलेली मांडणी, अभ्यास आणि संवेदनशीलता ही भविष्यात सक्षम नेतृत्व घडविण्याची नांदी आहे." तर स्टुडंट चॅप्टर प्रेसिडेंट तन्मय सिंग यांनी आपल्या मनोगतात सांगितले, "या युवा संसदेमुळे आम्हाला विधेयक मांडणी, चर्चासत्र, प्रतिवाद आणि निर्णयप्रक्रिया यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला आहे.

# कर्नाळा अभयारण्यात खंड्या पक्षाचे दर्शन

**खारघर : प्रतिनिधी**

पक्ष्यांसाठी नंदनवन मानल्या जाणाऱ्या कर्नाळा अभयारण्यात पावसाळ्याच्या सुरुवातीसोबतच रायगड जिल्ह्याचा जिल्हापक्षी असलेल्या दुर्मिळ 'खंड्या' किंवा 'ओरिएंटल ऑर्फ किंगफिशर'चे कर्नाळा पक्षी अभयारण्यात वसलेल्या कोरलवाडीत दर्शन झाले आहे. पक्षीमित्र रमेश वाघे यांनी खंड्याची छबी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. जून ते ऑगस्ट या प्रजननाच्या काळात खंड्या पक्षी मोठ्या संख्येने कर्नाळाच्या जंगलात दाखल होत असल्याने पक्षी निरीक्षक आणि निसर्गप्रेमींसाठी ही पर्वणी ठरली आहे.

केवळ १३ ते १४ सेमी आकाराचा हा जगातील सर्वात लहान खंड्या पक्ष्यांपैकी एक आहे. त्याच्या अंगावर चमकदार निळा, जांभळा, नारंगी आणि पिवळा रंगांची उधळण असते. लालसर चोच आणि पाय यामुळे तो सहज ओळखू येतो. इतर खंड्यांप्रमाणे हा मासे न पकडता जंगलातील ओढे, नाले, दलदलीच्या भागातून बेडूक, सरडे, किडे आणि मोठे कीटक पकडतो. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार दरवर्षी मान्सून सुरू होताच खंड्या प्रजननासाठी स्थलांतर करून कर्नाळ्यात येतो. मातीच्या कड्यांमध्ये किंवा झाडांच्या बुंध्यात बोगदा करून तो घरटे बांधतो. पावसाळ्यात मुबलक खाद्य उपलब्ध असल्याने या काळात त्याची संख्या लक्षणीय वाढते. नुकत्याच झालेल्या पाहणीत अभयारण्याच्या विविध भागात नर-मादी जोड्या फांद्यांवर बसून दृष्टीस पडल्या आहेत. रायगडचा जिल्हापक्षी असल्याने खंड्याचे संवर्धन महत्त्वाचे आहे.

# पनवेल महापालिकेकडून ग्रीन सोल्यूशन प्रयोगाची यशस्वी सुरुवात

## सॅल्व्हिनिया मॉलेस्टा घातक जलपर्णीचे निर्मूलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात नव्याने उदयास येणारे पर्यटनस्थळ म्हणून वडाळे तलाव नावारूपाला येत आहे.दररोज शेकडो पर्यटक याठिकाणाला भेट देतात सुट्टीच्या दिवशी हि संख्या हजारोंच्या घरात असते.मात्र या विस्तीर्ण तलावाच्या सौंदर्यात बाधा ठरलेल्या सॅल्व्हिनिया मॉलेस्टा' या घातक जलपर्णीमुळे शहरातील तलावांचे सौंदर्य टिकवण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने उचलले पाऊल यशस्वी होत आहे. महापालिका आणि आयसीएआर खरपतवार संशोधन संचालनालय, जबलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वडाळे तलावात राबविलेल्या 'जैविक नियंत्रण' प्रकल्पाचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. रसायने न वापरता केवळ नैसर्गिक कीटकांद्वारे घातक जलपर्णीचा नायनाट करण्याच्या या प्रयोगामुळे वडाळे तलाव पुन्हा एकदा डौलाने उभा राहू लागला आहे.

वडाळे तलावाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे २२ एकर म्हणजे ९ हेक्टर आहे. गेल्या काही वर्षांत यापैकी ५० टक्के म्हणजे ४.५ हेक्टर क्षेत्रावर 'सॅल्व्हिनिया मॉलेस्टा' या ब्राझीलमधून आलेल्या जलपर्णीने संपूर्ण पृष्ठभाग झाकून टाकला होता. ही जलपर्णी स्वच्छ पाण्यात प्रचंड वेगाने वाढते. पाण्यातील सूर्यप्रकाश अडवून ऑक्सिजनची पातळी कमी करते. त्यामुळे मासे आणि इतर जलचरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. तलावाचे सौंदर्य तर बिघडतेच, पण डासांची पैदास वाढून नागरिकांच्या



आरोग्यालाही धोका निर्माण होतो.ही समस्या कायमची सोडवण्यासाठी महापालिकेने एप्रिल २०२६ ते ऑक्टोबर २०२७ या १८ महिन्यांचा दीर्घकालीन प्रकल्प आखला. ७ मे २०२६ रोजी या उपक्रमाला अधिकृत सुरुवात झाली.महापौर नितीन पाटील यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाची सुरुवात झाली.पर्यावरण प्रेमी ज्योती नाडकर्णी यांनी याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांनी या प्रस्तावाबाबत माहिती दिल्यानंतर आयुक्तांनी त्वरित याबाबत अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ वैभव विधाते यांना दिले त्यानुसार आयसीएआर खरपतवार संशोधन संचालनालयाच्या मुख्य संशोधक डॉ. अर्चना अनोखे आणि सह-संशोधक डॉ. दीक्षा एम. जी. यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविला जात आहे.पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी याबाबत प्रशासकीय पातळीवरील सर्वतोपरी मदत या संस्थेला केली.विशेष म्हणजे तलावाला जोडले गेलेले नाही ,गटार यांचा शोध घेऊन ते पूर्णपणे बंदिस्त केले जेणे करून तलावात केवळ नैसर्गिक स्त्रोतांमार्फत निर्माण होणाऱ्या जलसाठ्यातील पाणी राहील.उपायुक्त डॉ वैभव विधाते यांनी आयुक्तांच्या मार्गदर्शनात या प्रकल्पाचा डे टू डे आढावा घेतल्याने आज या प्रकल्पाचे परिणाम दिसू लागले आहेत.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे 'सायटोबॅगस सॅल्व्हिनी' म्हणजेच Cyrtobagous salviniiae या नैसर्गिक कीटकाचा वापर. रासायनिक फवारणी न करता या कीटकांद्वारे जैविक नियंत्रण केले जात आहे. प्रति हेक्टर २२,५०० या प्रमाणे एकूण १,०१,२५० कीटक तलावात सोडण्यात आले. हे कीटक केवळ सॅल्व्हिनियाची पाने आणि फांद्या खात. त्यामुळे तण आतून कुजून नैसर्गिकरित्या तलावाच्या तळाशी जाऊ लागले आहे.या पद्धतीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे सुरक्षितता. कीटकांमुळे पाणी, मासे, बेडूक किंवा इतर कोणत्याही जलचरांना कोणतीही हानी होत नाही. त्यामुळे पर्यावरणीय संतुलन अबाधित राहिले आहे. तलावातील पाण्याचे अभिसरण सुधारल्याने पाणी स्वच्छ होत आहे. स्थलांतरित पक्ष्यांसाठीही पुन्हा सुरक्षित अधिवास तयार होऊ लागला आहे. स्थानिक नागरिकांनीही तलावाच्या बदललेल्या रूपाचे स्वागत केले आहे.

केवळ ११ लाख ८० हजार १२० रुपये खर्चाच्या या प्रकल्पातून वडाळे तलावरील जलपर्णी पूर्णपणे नष्ट होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे .त्याचे परिणामही दिसू लागले आहेत.रसायनविरहित, स्वस्त आणि शाश्वत उपाय म्हणून महापालिकेचा हा प्रयोग राज्यभरातील इतर महापालिकांसाठी आदर्श ठरत आहे.

> **पनवेल शहरातील वडाळे तलाव ही शहराची शान आहे. महापालिकेने कायापालट केलेले हे ठिकाण शहराबाहेरील नागरिकांचे आकर्षण ठरत असताना तलावातील नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन करणे गरजेचे आहे, त्यानुसार पालिकेने राबविलेल्या ग्रीन सोल्युशन प्रयोग यशस्वी ठरत आहे. पुढील काळात घातक वनस्पतीचे पूर्णपणे उच्चाटन होईल.**
>
> **- मंगेश चितळे,** आयुक्त, पनवेल महानगरपालिका

# खैर तस्करीचा पर्दाफाश

## सुधागडात संतप्त ग्रामस्थांकडून वाहनाची तोडफोड



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात खैर लाकडाच्या अवैध तस्करीविरोधात वन विभागाने कारवाई केली असून धोंडसे व सिद्धेश्वर परिसरात दोन वाहनांसह खैर लाकडाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार टेम्पो क्रमांक एमएच ०६ सीपी २२६०मधून १४ हजार २२६ रुपये किमतीचे खैर लाकूड आणि स्कॉर्पिओ क्रमांक एमएच ०६ एन १२७६मधून १३ हजार ३३९ रुपये किमतीचे खैर लाकूड जप्त करण्यात आले. या कारवाईनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

खैर तस्करी सुरू असल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ जमा झाले. तस्करीविरोधात संताप व्यक्त करत ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडले. यावेळी संतप्त जमावाने संशयित स्कॉर्पिओ वाहनाची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी संशयित ताब्यात घेतलेल्या व्यक्ती ऋतिक राठोड, राजू हिलम, रोहित चोरगे, प्रशांत जाधव असल्याची माहिती वन अधिकाऱ्यांनी दिली. वन विभागाने वनक्षेत्र कार्यालय, सुधागड-पाली येथे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

परीक्षेत्र वनाधिकारी विशाल सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये आनंद कराडे, उत्तम शिंदे, संदीप ठाकरे, सुनील जाधवर, व्यंकट पवार, गुलचंद काकडे आणि अविनाश पवार यांनी सहभाग घेतला.

# अवचितगडावर ऐतिहासिक वारशाचे जतन

## दरीतून दोन तोफा काढून पुन्हा केल्या स्थापित

**पाली : प्रतिनिधी**

दुर्गम गडकिल्ल्यांचा इतिहास आणि त्यांचा अनमोल ठेवा जतन करण्यासाठी शिवशंभो प्रतिष्ठान रोहा व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांनी अवचितगड येथे एक अत्यंत थरारक आणि कौशल्याने परिपूर्ण अशी संयुक्त मोहीम नुकतीच यशस्वीपणे पार पाडली आहे. या मोहिमेंतर्गत अवघड दरीतून दोन ऐतिहासिक तोफांना सुरक्षितपणे वर आणून गडावर पुन्हा स्थापित करण्यात आले.

या मोहिमेची सुरुवात शिवशंभो प्रतिष्ठानच्या सदस्यांनी राबविलेल्या गड-अभ्यास मोहिमेने झाली. या अभ्यासादरम्यान गडाच्या उत्तरेकडील बुरुजापासून सुमारे ५५० मीटर अंतरावर पहिली, तर त्यापासून अवघ्या १०० मीटर अंतरावर दुसरी




अशा दोन ऐतिहासिक तोफा आढळून आल्या. इतिहासाचा हा सुवर्णकाळ डोळ्यांसमोर आणणारा ठेवा जतन करण्यासाठी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून प्रत्यक्ष संवर्धन मोहिमेला सुरुवात झाली.

मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात सायंकाळी ९ वाजेपर्यंत पहिली तोफ गडावर आणण्यात यश आले, मात्र दुसरी तोफ अतिशय खोल आणि दुर्गम दरीत असल्याने तिला वर काढणे एक मोठे आव्हान होते. या दोन्ही तोफांचे वजन प्रत्येकी अंदाजे ३५० ते ४०० किलोग्रॅम होते. या अवजड तोफेच्या स्थलांतरासाठी प्रतिष्ठानने सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या प्रशिक्षित बचाव पथकाची मदत घेतली. पथकाने आधुनिक टेक्निकल रोप रेस्क्यू प्रणाली, अचूक अँकरिंग आणि योग्य भारवाटप पद्धतीचा वापर करून अत्यंत नियोजनबद्ध रितीने ही तोफ दरीतून बाहेर काढली.

या यशस्वी आणि जोखमीच्या मोहिमेमुळे अवचितगडाचा ऐतिहासिक वारसा तर सुरक्षित झालाच, पण सोबतच बचाव पथकाच्या कौशल्याचीही यशस्वी चाचणी झाली.

# कानिफनाथ मंदिरात नवीन देवमूर्तीची प्राणप्रतिष्ठा





**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील मराठाआळी परिसरातील श्री कानिफनाथ मंदिरात नवीन देवमूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या पवित्र धार्मिक सोहळ्यात भाविकांनी उपस्थित राहून देवदर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

मराठाआळी ग्रामस्थ तसेच केएमजी विभाग नागोठणे यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाची सुरुवात ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर नवीन देवमूर्तीची भव्य मिरवणूक वाजतगाजत मंदिराकडे रवाना झाली. मंदिरात आगमनानंतर विविध धार्मिक विधी पार पडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी द्वारपाल पूजन, मंदिर प्रवेश, विधान पूजन, महाअभिषेक व यज्ञकर्म आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. दुपारी १२ वाजता पूजा-अर्चा व होमहवन करून नवीन देवमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानंतर पूर्णाहुती, महाआरती, नवनाथांवरील प्रवचन, हरिपाठ व महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. सायंकाळी हभप भगवानमहाराज कदम यांचे प्रवचन झाले. त्यानंतर गायक प्रफुल नागोठणेकर, तबला वादक कौस्तुभ दिवेकर व सहकाऱ्यांसह श्री स्वामी समर्थ प्रासादिक भजन मंडळ यांच्या सुरेल भजनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. रात्री महाप्रसादानंतर या धार्मिक सोहळ्याची सांगता करण्यात झाली.

# राहील घलटे शिक्षक प्रतिनिधीपदी नियुक्त

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथील नवीन शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक प्रतिनिधी म्हणून राहील फिरोज घलटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मागील शिक्षक प्रतिनिधी भारत चव्हाण यांचा कार्यकाल समाप्त झाल्याने ही निवड नव्याने करण्यात आली आहे.

यावेळी शिक्षकेतर प्रतिनिधी म्हणून संतोष बुल्लू यांची, तर शिक्षक पालक संघाच्या सचिवपदी अमर धरणे यांची निवड झाली आहे. या सर्व नवनिर्वाचितांचे मुख्याध्यापक अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# वडगाव रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे भूमिपूजन



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वडगाव येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून जिल्हा खनिजकर्म निधी अंतर्गत या रस्त्याच्या कामासाठी एक कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांच्या हस्ते आणि पंचायत समिती सदस्य गौरी गडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

वडगाव येथील हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत होता. पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून तलावासारखी परिस्थिती निर्माण होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी करण्यात येत होती. दरम्यान, माजी सरपंच महादेव गडगे आणि पंचायत समिती सदस्य गौरी गडगे यांचा सातत्याने या रस्त्याच्या समस्येबाबत आमदार महेश बालदी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. आमदार बालदी यांनी रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे आश्वासन देत आवश्यक निधी उपलब्ध करून दिला.

भूमिपूजन सोहळ्यावेळी ग्रामस्थ व महिला मंडळ यांनी आमदार महेश बादली यांचे आभार मानले. या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाल्यानंतर वडगाव परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाची सोय अधिक सुलभ होणार आहे तसेच पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांपासूनही ग्रामस्थांची सुटका होणार आहे.

# मोरे महिला महाविद्यालयात योग शिबिर उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशन संचलित सौ. वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव येथे योग दिनानिमित्त विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या योग प्रशिक्षिका सुषमा तलवार यांनी विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. योगाचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व त्यांनी विषद केले तसेच विविध योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांकडूनही सराव करून घेतला. यावेळी विद्यार्थांनी योगाचा नियमित अंगीकार करण्याचा संकल्प केला. शिबिराचे नियोजन महिला महाविद्यालयाच्या ग्रंथपाल निर्मला थोरात यांनी केले.



# नागोठणे परिसरात वीजविषयक समस्या ; आमदार अनिकेत तटकरे यांना निवेदन

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे व परिसरात गेल्या काही महिन्यांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी तसेच लघुउद्योगांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी पंचायत समिती सदस्य समृद्धी कोळी यांनी आमदार अनिकेत तटकरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

यावेळी राष्ट्रवादीचे नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, प्रमोद जांबेकर, मनोज टके, रोशन पारंगे, ध्रुव सोष्टे, मोरेश्वर तेलंगे, नेत्रा पारंगे आदी पदाधिकारी व



कार्यकर्ते उपस्थित होते.

नागोठणे विभागामध्ये वारंवार वीजखंडित होत असल्याने नागरिकांना अनेक तास अंधारात राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पूर्वी कानसई ते बाळसईदरम्यान वीजवाहिनीवर तांत्रिक बिघाड झाल्यास एमआयडीसी वीजवाहिनीमार्फत पर्यायी वीजपुरवठा सुरू करण्यात येत होता. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत होता, मात्र सध्या एमआयडीसीवर लोड जास्त आह असे कारण देत पर्यायी वीजपुरवठा देण्यात येत नसल्याची बाबही निवेदनातून मांडण्यात आली आहे.

वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना, पर्यायी वीजपुरवठा सुरू ठेवणे, अतिरिक्त क्षमतेची उपलब्धता, वीजवाहिन्या व ट्रान्सफॉर्मरची तपासणी, आपत्कालीन पथकाची नियुक्ती, वरिष्ठ स्तरावरील बैठक तसेच भविष्यातील वाढती मागणी लक्षात घेऊन नवीन उपकेंद्र व फीडर उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी नागोठणे विभागातील वीजपुरवठ्याच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# मजगाव मराठी शाळेत योग दिन साजरा



**मुरूड : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद मजगाव मराठी शाळेत मोठ्या उत्साहात योग दिन साजरा करण्यात आला. सहशिक्षक चेतन चव्हाण यांनी योगाचे विविध प्रकार प्रात्याक्षिकाद्वारे दाखवले.

शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग आवश्यक आहे. दररोज योग केल्याने शरीराला ऊर्जा, मनाला शांती मिळते. एकाग्रता वाढते आणि तणाव कमी होतो. मानवी आरोग्याच्या दृष्टिकोनातून योग करणे हितावह असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ यांनी सांगितले.

यावेळी शिक्षक बाळासाहेब फुंदे, स्वप्नाली बाजी, हर्षा नांदगावकर, संतोष दहातोंडे शिक्षक उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांसमवेत योगासने केली.

# पावसाळा सुरू होताच समुद्रकिनारे ओस

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोकणात पावसाचे आगमन होताच अलिबाग, रेवदंडा, नागाव, काशीद, मुरूड येथील समुद्रकिनाऱ्यांवरील पर्यटकांची वर्दळ कमी झाली आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये हजारो पर्यटक आणि चाकरमानींनी गजबजलेल्या या पर्यटनस्थळांवर सध्या शांतता पसरली असून पर्यटनावर आधारित व्यवसायांवर त्याचा थेट परिणाम होत आहे.

सुट्ट्या संपल्याने चाकरमानी आपापल्या नोकरीच्या ठिकाणी परतले असून पावसाळी वातावरणामुळे पर्यटकांचाही ओघ कमी झाला आहे. परिणामी मे महिन्यात हाऊसफुल्ल असलेली हॉटेल्स, रिसॉर्ट्स, होमस्टे तसेच समुद्रकिनाऱ्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते, जलक्रीडा व्यावसायिक, घोडागाडी चालक आणि स्थानिक व्यापाऱ्यांचा व्यवसाय मंदावला आहे. पर्यटकांची संख्या घटल्याने पर्यटनावर अवलंबून



असलेल्या अनेक लहान-मोठ्या व्यावसायिकांना आर्थिक फटका बसत आहे.

पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने जलक्रीडा उपक्रम बंद ठेवावे लागतात तसेच सततचा पाऊस आणि खराब हवामानामुळे पर्यटक समुद्रकिनाऱ्यांकडे पाठ फिरवत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे स्थानिक अर्थचक्रावर काही प्रमाणात परिणाम जाणवत आहे. रेवदंडा बीचसह अन्य समुद्रकिनाऱ्यांवर दिवसभर तुरळक पर्यटक दिसून येत असून नेहमीची गजबज पूर्णपणे ओसरली आहे.

स्थानिक व्यावसायिकांच्या मते, गणेशोत्सवापर्यंत पर्यटन व्यवसायात विशेष वाढ होण्याची शक्यता कमी असून पावसाळी पर्यटनावरच काही प्रमाणात व्यवसाय अवलंबून राहणार आहे, परंतु हिरवाईने नटलेला कोकण अनुभवण्यासाठी काही पर्यटक अजूनही भेट देत असल्याने व्यवसायाला थोडाफार आधार मिळत आहे.

दरम्यान, समुद्रकिनाऱ्यांवर सुरक्षा उपाययोजना वाढविण्यात आल्या असून प्रशासनाकडून पर्यटकांना समुद्रात उतरताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने पर्यटकांनी धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



**खोपोली : भारतीय किसान मोर्चातर्फे केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर खालापूर तालुक्यातील होराळे गावी केशव मुरूमकर यांच्या शिवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात झाला. कृषीतज्ज्ञ शेखर भरसावळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान मोर्चाचे सुनील गोगटे, या अभियानाचे प्रमुख मनीष खवळे, विठ्ठल मोरे, संजय तन्ना, तालुकाप्रमुख शनि यादव यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

# फ्रान्सची बाद फेरीत धडक

## एम्बापेचे वादळ; इराकवर एकतर्फी मात



**फिलाडेल्फिया : वृत्तसंस्था**

फिलाडेल्फियामध्ये आलेल्या भीषण वादळावर आणि इराकच्या आव्हानावर मात करत फ्रान्सने फिफा विश्वचषक स्पर्धेत आपला विजयी धडाका कायम ठेवला. कर्णधार किलियन एम्बापेच्या दोन धडाकेबाज गोल्सच्या जोरावर फ्रान्सने इराकचा ३-० असा धुव्वा उडवला. या सलग दुसऱ्या विजयासह फ्रान्सने एक सामना शिल्लक असतानाच बाद फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच दिदिएर डेशचॅम्प्स यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या फ्रान्सने आक्रमक धोरण स्वीकारले. खेळाच्या पहिल्या हाफमध्ये किलियन एम्बापेने २२ यार्डांवरून एक अप्रतिम, वेगवान फटका मारत फ्रान्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र मध्यंतराच्या वेळी अचानक आलेल्या विजांच्या कडकडाटासह वादळामुळे सामना तब्बल दोन तास थांबवावा लागला. विश्वचषकाच्या इतिहासातील हा पहिलाच हवामानविषयक मोठा व्यत्यय ठरला.

सामना पुन्हा सुरू झाल्यावर फ्रान्सने खेळावरील पकड सैल होऊ दिली नाही. इराकच्या बचावात्मक चुकांचा फायदा घेत एम्बापेने वैयक्तिक दुसरा गोल नोंदवला. यासह एम्बापेचे या विश्वचषकातील एकूण चार गोल झाले असून विश्वचषक इतिहासातील सर्वाधिक गोल करणाऱ्या मेस्सीच्या १८ गोलच्या विक्रमापासून तो आता अवघा दोन गोल दूर आहे. या सामन्यात विंगर ओस्मान डेम्बेलेने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील आपल्या २०व्या सामन्यात पहिला ऐतिहासिक गोल झळकावला.

# रोनाल्डोने विश्वचषकात रचला इतिहास!

## पोर्तुगालकडून उझबेकिस्तानचा ५-०ने धुव्वा

**ह्युस्टन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या गट 'क'मधील सामन्यात पोर्तुगालने उझबेकिस्तानचा ५-० असा एकतर्फी पराभव करत स्पर्धेतील पहिला विजय नोंदवला. सलामीच्या सामन्यात डीआर काँगोविरुद्ध बरोबरी झाल्यानंतर पोर्तुगालने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ खेळला आणि प्रतिस्पर्धी संघाला कोणतीही संधी दिली नाही. पोर्तुगालकडून ख्रिस्तियानो रोनाल्डोने ६व्या आणि ३९व्या मिनिटाला दोन गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

याशिवाय नुनो मेंडेसने १७व्या मिनिटाला शानदार फ्री किकवर गोल केला, तर ६०व्या मिनिटाला उझबेकिस्तानचा गोलरक्षक नेमाटोव्हकडून ओन गोल झाला. सामन्याच्या अखेरीस राफा लिओने



८७व्या मिनिटाला गोल करत पोर्तुगालचा ५-० असा विजय निश्चित केला. या विजयासह पोर्तुगालने चार गुणांसह गटात अव्वल स्थान पटकावले. उझबेकिस्तानचा अझीझजॉन गनीव याने एक गोल केला होता, मात्र फाऊल झाल्याने पंचांनी तो अमान्य केला.

या सामन्यातील पहिल्या गोलसह ख्रिस्तियानो रोनाल्डो सहा वेगवेगळ्या विश्वचषक स्पर्धांमध्ये गोल करणारा पहिला खेळाडू ठरला. याशिवाय दुसरा गोल करत रोनाल्डोने विश्वचषकातील आपल्या गोलांची संख्या १०वर नेली. त्यामुळे त्याने पोर्तुगालचा महान खेळाडू युसेबियोचा नऊ गोलचा विक्रम मोडीत काढत विश्वचषकात पोर्तुगालसाठी सर्वाधिक गोल करणारा खेळाडू होण्याचा मान मिळवला.

वयाच्या ४१ वर्षे असताना विश्वचषकात गोल करणारा रोनाल्डो हा दुसरा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. या यादीत कॅमेरूनच्या रॉजर मिला यांचा पहिला क्रमांक आहे. त्यांनी १९९४च्या विश्वचषकात ४२ वर्षे वयात गोल केला होता. सामन्यातील शानदार कामगिरीबद्दल रोनाल्डोला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्काराने गौरवण्यात आले.

# भारताची श्री चरणी महिला टी-२० क्रमवारीत अग्रस्थानी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची २१ वर्षीय युवा फिरकीपटू श्री चरणी हिने इतिहास रचला आहे. आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यानंतर अवघ्या एका वर्षाच्या आत ती महिला टी-२० क्रिकेटमधील जगातील अव्वल गोलंदाज बनली आहे.

श्री चरणीने २८ जून २०२५ रोजी पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील जबरदस्त कामगिरीसह तिने क्रमवारीत अव्वलस्थानी झेप घेतली. यंदाच्या टी-२० हंगामातील तीन सामन्यांत तिने १० विकेट्स घेतल्या आहेत. या कामगिरीसह तिने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील एका हंगामात सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या पूनम यादवच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. उर्वरित दोन सामन्यात तिला एका हंगामात सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विश्वविक्रम खुणावत आहे.

महिला टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर कोणताही बदल झालेला नाही. ऑस्ट्रेलियाची सलामीवीर जॉर्जिया अजूनही नंबर १ फलंदाज आहे. तिची सहकारी बेथ मूनी एका स्थानाने सुधारणा करत दुसऱ्या क्रमांकावर पोहचली आहे. भारतीय संघातील युवा सलामीची बॅटर शफाली वर्मा एका स्थानाच्या सुधारणेसह सहाव्या, तर कर्णधार हरमनप्रीत कौर एका स्थानाच्या सुधारणेसह टॉप १०मध्ये पोहचली आहे.



# इंग्लंडची घानाविरुद्ध गोलशून्य बरोबरी

**बोस्टन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडला घानाविरुद्ध अपेक्षित विजय मिळवण्यात अपयश आले. ग्रुप एलमधील या सामन्यात दोन्ही संघांनी ०-० अशी गोलशून्य बरोबरी साधली. अनेक संधी निर्माण करूनही इंग्लंडला एकही गोल करता आला नाही.

सामन्यात इंग्लंड संघाने तब्बल १९ शॉट्स मारले, तर घानाला केवळ दोनच संधी मिळाल्या, मात्र घानाचा राखीव गोलरक्षक बेंजामिन असारे याने उत्कृष्ट बचाव करत इंग्लंडचे प्रयत्न हाणून पाडले. या बरोबरीनंतर इंग्लंड आणि घाना या दोन्ही संघांचे प्रत्येकी चार गुण झाले आहेत.



# अलिबागेत आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड आणि प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग, कुलाबा क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ऑलिम्पिक मशाल रॅलीचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे करण्यात आले.

या रॅलीत खेळाडू, क्रीडाप्रेमी, कुलाबा क्रीडा प्रबोधिनीचे विद्यार्थी, स्पर्धा विश्व अकॅडमीचे विद्यार्थी, प्रिझम संस्थेचे स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ऑलिम्पिक चळवळीचे महत्त्व, खेळांमधील एकता आणि जागतिक बंधूत्वाचा संदेश देणारी ही रॅली होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ऑलिम्पिक मशालीचे पूजन करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे मार्गदर्शक संदीप गुरव, भक्ती तिवारी, सुरेंद्र पाटील, यतीराज पाटील आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी आदी उपस्थित होते.

या रॅलीद्वारे युवकांमध्ये क्रीडासंस्कार, शिस्त, संघभावना व उत्तम आरोग्याचे महत्त्व याची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर सकाळच्या सत्रात परिसंवाद व चर्चासत्राचेदेखील आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.

# नॉर्वेचे 'वायकिंग रो' सेलिब्रेशन चर्चेत

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपमध्ये नॉर्वे संघाच्या कामगिरीइतकीच त्यांच्या 'वायकिंग रो' सेलिब्रेशनची चर्चा रंगली आहे. विश्वचषकातील सर्वाधिक व्हायरल ट्रेंडपैकी एक ठरलेल्या या अनोख्या सेलिब्रेशनने फुटबॉल चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

सेनेगलविरुद्ध ३-२ अशा रोमांचक विजयासह नॉर्वेने बाद फेरीत प्रवेश केला. सामन्यानंतर कर्णधार मार्टिन ओडेगार्ड आणि स्टार स्ट्रायकर एर्लिंग हालांड यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण संघ मैदानावर बसला आणि 'वायकिंग रो' सेलिब्रेशन करत चाहत्यांसोबत आनंद साजरा केला.

'वायकिंग रो' हे नॉर्वेच्या ऐतिहासिक वायकिंग परंपरेतून प्रेरित सेलिब्रेशन आहे. वायकिंग युग साधारणपणे इ.स. ७०० ते ११०० या काळात होते. त्या



काळातील नॉर्वे, स्वीडन आणि डेन्मार्कमधील वायकिंग योद्धे लांब नौकांमधून समुद्र प्रवास करत विविध देशांमध्ये व्यापार आणि मोहिमा राबवत असत. या सेलिब्रेशनमध्ये खेळाडू आणि चाहते नौका चालवण्याच्या हालचालींची नक्कल करतात. हे वायकिंगांच्या समुद्री प्रवासाचे प्रतीक मानले जाते आणि नॉर्वेच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे.

# एफआयएच प्रो लीग : भारताचा पाकिस्तानवर थरारक विजय

**लंडन : वृत्तसंस्था**

लंडनमध्ये खेळल्या गेलेल्या एफआयएच प्रो लीग २०२६मधील बहुचर्चित भारत-पाकिस्तान सामन्यात भारतीय हॉकी संघाने ४-३ असा रोमांचक विजय मिळवत कट्टर प्रतिस्पर्ध्यावर पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. एकवेळ भारताने ४-१ अशी भक्कम आघाडी घेतली होती, मात्र अखेरच्या मिनिटांत पाकिस्तानने जोरदार पुनरागमन करत सामना चुरशीचा बनवला.

सामन्याच्या सुरुवातीलाच पाकिस्तानने गोल करत १-० अशी आघाडी घेतली. पहिल्या क्वार्टरमध्ये भारताला अनेक पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण पाकिस्तानच्या बचावफळीने सर्व प्रयत्न निष्फळ ठरवले. त्यामुळे पहिल्या सत्राअखेर पाकिस्तानकडे एक गोलची आघाडी कायम होती.दुसऱ्या क्वॉर्टरमध्ये मात्र भारताने दमदार पुनरागमन केले. अभिषेकने शानदार गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर निलाकांत शर्माने अचूक



फिनिशिंग करत भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. मध्यांतरापर्यंत भारतीय संघाने सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले होते.तिसऱ्या क्वॉर्टरध्ये भारताचा आक्रमक खेळ कायम राहिला. सुखजीत सिंहने सुंदर गोल करत भारताची आघाडी ३-१ अशी वाढवली. पाकिस्तानच्या बचावफळीवर सतत दबाव निर्माण करत भारतीय खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यांना गोल करण्याची संधीच दिली नाही.

अंतिम क्वॉर्टरमध्ये भारताने आणखी एक गोल करत स्कोर ४-१ असा केला. त्यानंतर सामना भारताच्या खिशात गेला असे वाटत असतानाच पाकिस्तानने शेवटच्या काही मिनिटांत जोरदार प्रतिहल्ला चढवला. सलग दोन गोल करत त्यांनी ४-३ असा स्कोर करत भारतीय चाहत्यांची धडधड वाढवली. मात्र निर्णायक क्षणी भारतीय बचावफळीने शानदार खेळ दाखवला. पाकिस्तानचे सर्व प्रयत्न हाणून पाडत भारताने अखेर ४-३ असा विजय निश्चित केला. या विजयामुळे भारताने महत्त्वाचे तीन गुण मिळवले आणि प्रो लीगमधील आपली मोहीम अधिक मजबूत केली.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी भारतीय महिला हॉकी संघाने चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर एफआयएच नेशन्स कपचे जेतेपद पटकावले होते. २०२२मधील पहिल्या हंगामात चॅम्पियन बनल्यानंतर २०२६मध्ये भारतीय संघाने यजमान न्यूझीलंडला अंतिम सामन्यात २-०ने पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयासोबतच भारतीय महिला संघ एफआईएच हॉकी प्रो लीग २०२६-२७साठीही पात्र ठरला आहे.

# काँगोला नमवून कोलंबिया बाद फेरीत

**ग्वादालहारा** : डॅनियल मुनोजच्या निर्णायक गोलच्या जोरावर कोलंबियाने काँगोचा १-० असा पराभव करत विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रवेश केला. या विजयासह कोलंबियाने 'के' गटात आपले स्थान अधिक भक्कम केले असून त्यांचा विजयी रथ अविरत सुरू आहे. सामन्याच्या सुरुवातीपासूनच कोलंबियाने आक्रमक पवित्रा घेतला होता, मात्र काँगोचा गोलरक्षक लिओनेल म्पासी याने पहिल्या २० मिनिटांत केलेले पाच अप्रतिम बचाव कोलंबियाच्या विजयातील मोठा अडथळा ठरले होते. अखेर ७६व्या मिनिटाला मुनोजने गोल करत हा कोंडी फोडली. त्याला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आले.

# 'आरडीसीए' करणार अनुभवी प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, निवडकर्त्यांची नियुक्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) वतीने २९२६-२७ या क्रिकेट हंगामासाठी जिल्ह्यातील क्रिकेट क्षेत्रातील अनुभवी प्रशिक्षकांची, संघ व्यवस्थापकांची व संघ निवडकर्त्यांची नियुक्ती करणार आहे. त्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी माहिती आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी दिली.

आरडीसीएच्या वतीने विविध वयोगटातील मुला-मुलींच्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्याचबरोबर जिल्ह्यातील तळागाळातील होतकरू व गुणवान क्रिकेट खेळाडूंचा शोध घेण्यासाठी टॅलेंट हंटसारख्या उपक्रमातून खेळाडूंची निवड करण्यात येत आहे. स्पर्धेमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या व टॅलेंट हंटसारख्या उपक्रमातून निवड झालेल्या खेळाडूंना आरडीसीएच्या वतीने सराव सामन्यांचे व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येते.

या सर्व उपक्रमांसाठी, येणाऱ्या क्रिकेट हंगामासाठी जिल्ह्याचा विविध वयोगटातील मुला-मुलींचा संघ निवडण्यासाठी तसेच त्यांना उत्तम प्रकारचे प्रशिक्षण देण्याकरिता अनुभवी प्रशिक्षकांची, संघ व्यवस्थापकांची आणि संघ निवडकर्त्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील क्रिकेट क्षेत्रातील अनुभवी इच्छुकांनी आरडीसीएचा अधिकृत ई-मेल अॅड्रेस rdcaanirudhapatil@gmail.comवर आपला अर्ज करायचा आहे.

यामध्ये आपले क्रिकेट क्षेत्रातील अनुभव, आपण क्रिकेट खेळासाठी दिलेले योगदान यासह आपला संपूर्ण परिचय पत्र ३० जूनपर्यंत पाठवायचे आहे. पात्र व्यक्तींची नेमणूक विविध पदांसाठी करण्यात येईल, अशी माहिती आरडीसीएचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी दिली.

अधिक माहितीसाठी आरडीसीएचे सदस्य अरुण शिंदे (९५२७६०८०८०) किंवा देवेंद्र पाटील (९२२६९५११७६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## भावपूर्ण श्रध्दांजली



**कै. वसंत कृष्णाजी ठाकूर**

यांचे बुधवार, दिनांक १७/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना...

**दशक्रिया विधी**

शुक्रवार, दिनांक २६/०६/२०२६ रोजी सकाळी १० वा. श्री क्षेत्र तमनाथ येथे होणार आहे.

**उत्तरकार्य**

शनिवार, दिनांक २७/०६/२०२६ रोजी मु. कर्जत येथे राहत्या घरी होणार आहे.

**शोकाकूल**

वसुधा वसंत ठाकूर (पत्नी)
समीधा वसंत ठाकूर (मुलगी), कु. साहिल वसंत ठाकूर (मुलगा)

पत्ता : मु. चारफाटा-कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com